रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १४४
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, १० डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

‘ध्वज दिनी निधी संकलन हे मोठे देशकार्य’/२
पोलादपूरमध्ये रानडुकरांचा उच्छाद; माकडांचाही उपद्रव/५
प्रो कबड्डीत टायटन्सचा वॉरियर्सवर थरारक विजय/८

### ‘वेड इन इंडिया’ पर्यटनवाढीसाठी फायदेशीर –पंतप्रधान मोदी



**जयपूर** : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि. ९) जयपूरमध्ये सुरू झालेल्या रायझिंग राजस्थान ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिटचे उद्घाटन केले. या संमेलनाचा उद्देश स्थानिक गुंतवणूक वाढीस चालणे देणे हा असून या वेळी उपस्थितांना संबोधित करताना ‘वेड इन इंडिया’ घोषणेचा राज्यातील पर्यटन वाढण्यास फायदा होईल, असे मत पंतप्रधान मोदींनी व्यक्त केले. ते मागील काही काळापासून वेड इन इंडिया संकल्पनेवर भर देताना दिसत आहेत. देशातील नामांकित जोडपी लग्न सोहळा परदेशात आयोजित करतात. या पार्श्वभूमीवर सरकारकडून वेड इन इंडियाचा प्रसार केला जात आहे. या अंतर्गत बाहेरच्या देशात होणारे भारतीयांचे लग्न समारंभ देशातच केले जावेत, जेणेकरून भारतीय अर्थव्यवस्थेला त्याचा फायदा होईल, असे आवाहन केले जात आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# कर्नाटक सरकारची दडपशाही

## बेळगावमध्ये मराठीजनांची धरपकड; ८० जणांवर गुन्हा



**बेळगाव : वृत्तसंस्था**

बेळगावमध्ये पुन्हा एकदा मराठीजनांची मुस्कटदाबी सुरू झाली आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या महामेळाव्याला जाणारी नेतेमंडळी आणि कार्यकर्त्यांना कर्नाटक पोलिसांनी ताब्यात घेतले. समितीच्या ८० जणांवर जमावबंदी आदेश मोडल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२००४पासून बेळगावमध्ये कर्नाटक सरकारचे हिवाळी अधिवेशन होत असते. याच अधिवेशनात आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी मराठी भाषिक बेळगावमध्ये महामेळावा घेत असतात. सोमवार (दि.९)पासून सुरू होत असलेल्या कर्नाटक सरकारच्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र एकीकरण समितीच्या मेळाव्याला कर्नाटक पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतर मराठी भाषिक नेते व कार्यकर्ते छत्रपती संभाजी महाराज चौकामध्ये जमले, मात्र या ठिकाणी येणाऱ्या सर्व मराठी भाषिकांना कर्नाटक पोलिसांनी ताब्यात घेतले.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या समितीच्या कार्यकर्त्यांना आधी एपीएमसी पोलीस ठाण्यात नेऊन नंतर मारीहाळ पोलीस ठाण्यात हलवले. सायंकाळी सगळ्या कार्यकर्त्यांना सोडण्यात आले. या वेळी कार्यकर्त्यांनी ‘बेळगाव, कारवार, निपाणी, बीदर, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे’, ‘बेळगाव आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे’, अशी जोरदार घोषणाबाजी केली.

पोलिसांनी दडपशाही करून महामेळावा होऊ दिला नाही, तरीही महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांनी जमाव बंदी आदेशाला न जुमानता आणि अटकेला न घाबरता महामेळावा होणार असलेल्या ठिकाणी दाखल होऊन मराठी अस्मितेचे दर्शन घडवले आणि पुन्हा एकदा महाराष्ट्रात जाण्याची इच्छा व्यक्त केली.

दरम्यान, सीमाभागातील तणाव कमी करण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयातून चर्चेचा प्रस्ताव दिला जाणार आहे. या प्रस्तावानंतर १२ डिसेंबर रोजी दोन माजी मंत्री चर्चेसाठी जाणार असल्याचे वृत्त आहे.

# अन्यायाविरोधात एकत्रित आवाज महत्त्वाचा -लोकनेते रामशेठ ठाकूर

## मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला अटक; आरपीआयचे आमरण उपोषण मागे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्या ज्या वेळी समाजात अन्याय होतो त्या वेळी सर्वांनी एकत्रित येऊन त्या विरोधात आवाज उठवला पाहिजे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी (दि. ९) केले. अनुसूचित जातीच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला अटक करण्याच्या मागणीसाठी आरपीआयचे पनवेल महानगर जिल्हा क्षेत्राचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारपासून आमरण उपोषण सुरू होते. पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केल्याने हे उपोषण लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत सोमवारी मागे घेण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.





एका अनुसूचित जातीच्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या आरोपींविरोधात अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होऊनही त्यांना अद्याप अटक झाली नव्हती. त्यामुळे आरोपींना अटक करण्याची मागणी करत आरपीआयचे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्या उपस्थितीत आणि पनवेल महानगर जिल्हा क्षेत्राचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण सुरू होते. आरोपी शुभम पवार याने अनुसूचित जातीच्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिचा वारंवार गैरफायदा घेत युवतीची फसवणूक केली होती. यासाठी त्याला वडील कृष्णा पवार आणि आई अर्चना पवार यांनीही मदत केली. या प्रकरणी या तीनही आरोपींविरुद्ध खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तरीदेखील या आरोपींना अटक करण्यात आली नव्हती. याच्या निषेधार्थ तसेच तरुणीला न्याय मिळवून देत आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यासाठी पनवेल तालुका पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषण सुरू होते. या उपोषणाला रविवारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन पाठिंबा दिला होता.

दरम्यान, या गुन्ह्यातील मुख्य आरोपी शुभम पवार याला पोलिसांनी सोमवारी अटक केली. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते नारळ पाणी पिऊन उपोषण सोडण्यात आले. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, प्रभाकर कांबळे, दिनेश जाधव, सुरेंद्र सोरटे, मिलिंद कांबळे, प्रकाश कांबळे, नलिनी भाटकर, शारदा शिरोळे, सुशिला इंगळे, मल्हारी घाटविसावे, भारती कांबळे, चंद्रसेन कांबळे, अनिता साळवे, प्रशांत कांबळे, अनिल रोकडे, भास्कर ढोबळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी फेरनिवड

## सर्वपक्षीयांकडून अभिनंदन



**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा अध्यक्षपदी अ‍ॅड. राहुल नार्वेकर यांची फेरनिवड झाली आहे. या निवडणुकीसाठी नार्वेकर यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोधपणे निवड झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात राहुल नार्वेकर यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावास सदस्य सर्वश्री अनिल पाटील, अ‍ॅड. आशिष शेलार, चंद्रकांत पाटील यांनी अनुमोदन दिले. यानंतर हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी नार्वेकर यांच्या नावाचा विधानसभा अध्यक्षपदासाठीचा प्रस्ताव संमत झाल्याची घोषणा केली. नार्वेकर यांना मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले, भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे आदींनी अध्यक्षपदाच्या आसनापर्यंत सन्मानाने नेले.

विधानसभेच्या अध्यक्षपदी लागोपाठ दुसऱ्यांदा निवड होणारे राहुल नार्वेकर हे दुसरे अध्यक्ष आहेत. त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्यपद्धतीचा न्यायाधीश असा उल्लेख केला. ते म्हणाले, गेली अडीच वर्षे कन्फ्यूजन अधिक होते. कोण कोठे होते हेच कळत नव्हते. याच काळात तुम्ही न्यायाधीशांचे काम केले. अध्यक्षमहोदय मी पुन्हा येईन, असे म्हणाला नव्हता. तरी तुम्ही परत आलात, त्याबद्दलचे तुमचे अभिनंदन.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राहुल नार्वेकर यांच्या अभिनंदपर भाषणात म्हटले, नाना पटोलेंचे आभार मानतो. तुम्ही नार्वेकरांसाठी अध्यक्षपद रिक्त केले आणि तिथून गाडी सुरू झाली. याचे सगळे क्रेडिट तुम्हालाच आहे. त्यामुळे नाना आमचे खरे मित्र आहेत. मीडियासमोर काय बोलत असतील, ते जाऊद्या, पण त्यांचे आमचे प्रेम आहे.

कायद्याची उत्तम जाण असणारे अध्यक्ष या सभागृहाला लाभले आहेत. सभागृहासमोर आलेल्या प्रश्नांवर तितक्याच ताकदीने उत्तर देऊन त्यांनी सभागृह उत्तम चालविले असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

या वेळी विधानसभा सदस्य सर्वश्री जयंत पाटील, नाना पटोले, सुरेश धस, जितेंद्र आव्हाड, नितीन राऊत, विश्वजीत कदम, रोहित पाटील यांनीही अभिनंदनपर मनोगत व्यक्त केले.

# उपमुख्यमंत्री शिंदे विधान परिषदेच्या सभागृह नेतेपदी

**मुंबई : प्रतिनिधी**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधान परिषदेच्या सभागृह नेतेपदी निवड करण्यात आली आहे. उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सोमवारी (दि. ९) ही घोषणा केली.

दरम्यान, विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. विरोधी पक्षातील जयंत पाटील, जितेंद्र आव्हाडही उपस्थित होते. यात १६ ते २१ डिसेंबरदरम्यान नागपूर येथे हिवाळी अधिवेशन होणार हे निश्चित झाले.

## निवडक

### संजय मल्होत्रा आरबीआयचे नवे गव्हर्नर म्हणून नियुक्त



**नवी दिल्ली** : वित्त मंत्रालयातील सचिव (महसूल) संजय मल्होत्रा हे रिझर्व्ह बँकेचे पुढील गव्हर्नर असणार आहेत. केंद्र सरकारने सोमवारी (दि. ९) आरबीआयचे नवीन गव्हर्नर म्हणून मल्होत्रा यांच्या नावाची घोषणा केली. ते विद्यमान आरबीआय गव्हर्नर शक्तीकांत दास यांची जागा घेतील. त्यांचा कार्यकाळ १० डिसेंबरला संपत आहे. त्यानंतर ११ डिसेंबरपासून पुढील तीन वर्षांसाठी मल्होत्रा यांचा कार्यकाळ असेल.

### रशियन बांधणीची आयएनएस तुशिल युद्धनौका भारताला सुपूर्द

**नवी दिल्ली** : रशियात बांधणी करण्यात आलेली आयएनएस तुशिल ही शक्तिशाली युद्धनौका सोमवारी (दि. ९) रशियाने भारताला सुपूर्द केली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि नौदल प्रमुख अ‍ॅडमिरल दिनेश के त्रिपाठी हे रशियन बनावटीच्या आणि स्वदेशी क्षेपणास्त्रांसह आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज युद्धनौका आयएनएस तुशिल कार्यान्वित करताना उपस्थित होते.

# बांगलादेशातील हिंदूंच्या समर्थनार्थ रोह्यात मानवी साखळी




**रोहे : प्रतिनिधी**

बांगलादेशमधील हिंदूंवर धर्माच्या आधारावर होत असलेले अनन्वित जिहादी अत्याचार थांबावेत यासाठी बांगलादेश हिंदू न्याय यात्रा सर्वत्र काढण्यात येत आहे. याला अनुसरून रोहा शहरात बांगलादेशातील हिंदूंना समर्थन देण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने मानवी साखळी तयार करण्यात आली. यामध्ये मोठ्या प्रमाणात लोक सहभागी झाले होते.

या वेळी हभप मारुतीमहाराज कोलाटकर म्हणाले की, हिंदू धर्म हा सनातन धर्म असून आम्हाला धर्माबद्दलची आत्मियता, प्रेम आहे. आपला धर्म टिकला पाहिजे आणि धर्म टिकवायचा असेल तर संस्कृती जतन केली पाहिजे. धर्मासाठी, देशासाठी व देवासाठी एकत्र येणे आवश्यक आहे. बांगलादेशमधील हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात सरकारने हस्तक्षेप करून हा अत्याचार थांबवण्याची आवश्यकता आहे.

जयेश छेडा यांनी, धर्मरक्षणासाठी आता उभे राहिले पाहिजे. बांगलादेश निर्मितीसाठी आपल्या सैनिकांनी बलिदान दिले, मात्र आज बांगलादेशमध्ये चुकीचे होत आहे. त्यांच्या नांग्या वेळीच ठेचल्या पाहिजेत, असे म्हटले.

तेजस देशमुख यांनी धर्माला जिवंत ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्रित येण्याची गरज आहे. धर्म जगाला तर तुम्ही जगाल, असे सांगितले. शिवानी भांड यांनी बांगलादेशमधील हिंदूंवर होत असलेल्या अन्यायाचा आम्ही निषेध करतो, असे सांगून तेथील संत, साधूंना त्वरित मुक्त करावे, अशी मागणी केली. अशोक निकम यांनीही बांगलादेशात होत असलेल्या हिंदूंवरील अन्याय व अत्याचाराचा निषेध केला.

# हिंदूंवरील अत्याचाराविरोधात आज पनवेलमध्ये निदर्शने

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बांगलादेशमध्ये होत असलेल्या हिंदूंवरील अत्याचाराविरोधात जागतिक मानवाधिकार दिनाच्या दिवशी अर्थात मंगळवारी (दि. १०) सकल हिंदू समाज रायगडच्या वतीने पनवेलमध्ये मानवी साखळीद्वारे निदर्शने करण्यात येणार आहेत. बांगलादेशातील हिंदू समाजावर होत असलेला अत्याचार थांबवण्यासाठी आणि इस्कॉनच्या साधूंची तत्काळ मुक्तता व्हावी यासाठी सायंकाळी ४.३० वाजता पनवेल रेल्वेस्थानक ते पनवेल बसडेपो अशा मार्गाने ही निदर्शने होणार आहेत.

बांगलादेशात हिंदू समाजावर आणि अल्पसंख्याक समाजावर मुस्लिम कट्टरपंथीयांद्वारे अत्याचार होत आहेत. मंदिरे, घरे, दुकाने जाळली जात आहेत. तेथील हिंदू महिलांवरदेखील अमानवीय अत्याचार होत आहेत. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने याची दखल घ्यावी आणि तेथील मुंडा, चकमा, कुकी, बौद्ध इत्यादी, आदिवासी व दलित हिंदू बांधवांना इस्लामी कट्टरतावाद्यांच्या अमानवीय अत्याचारांपासून मुक्ती मिळावी, अशी मागणी आहे.

बांगलादेशचे सरकारदेखील हिंदूसोबतच अन्य अल्पसंख्याकांवरील अत्याचारास मूक संमतीच देताना दिसून येत आहे. या सर्व अत्याचारांची भारतातील हिंदू समाजास चिंता वाटत आहे. त्यामुळे अत्याचार थांबण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने पनवेलमध्ये मंगळवारी निदर्शने करण्यात येणार आहेत.

# माथेरान @ 11.2

## चालू वर्षातील नीचांकी तापमानाची नोंद



**माथेरान : प्रतिनिधी**

गिरीस्थान पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेले माथेरान आता चांगलेच गारठले आहे. येथे ११.२ सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली असून या वर्षातील हे नीचांकी तापमान असल्याची माहिती नगर परिषदेचे तापमान निरीक्षक अन्सार महापुळे यांनी दिली.

माथेरान हे समुद्रसपाटीपासून ८०३.६६ मीटर उंचीवर असून ७०० हेक्टर घनदाट जंगलात व्यापलेले आहे. त्यातील ३०० हेक्टर जंगल हे माथ्यावर असल्याने येथे बाराही महिने गारवा जाणवतो. गुलाबी थंडीचा आनंद घेण्यासाठी पर्यटक नेहमीच माथेरानला येत असतात. माथेरानचे तापमान सर्वसाधारण १३ ते २९ अंश इतके असते.

गुलाबी थंडीला सुरुवात झाल्यापासून माथेरानमध्ये या वर्षातील सर्वाधिक कमी तापमानाची नोंद करण्यात आली आहे. येथे सोमवारी (दि.९) सकाळी ११.२ सेल्सियस तापमानाची नोंद झाली असल्याचे तापमान निरीक्षक अन्सार महापुळे यांनी सांगितले.

राज्यभरात तापमानात बदल होत असताना माथेरान पर्यटनस्थळी वीकेण्डला आलेल्या पर्यटकांना येथील गुलाबी थंडीचा अनुभव घेता आला. नवविवाहित जोडप्यांनीसुद्धा माथेरानच्या गारेगार वातावरणात मनसोक्त फिरण्याचा आनंद घेतला.

> ***आम्ही पहिल्यांदाच माथेरानला फिरण्यासाठी आलो. या ठिकाणी जास्त प्रमाणात थंडी अनुभवयास मिळाली. आम्ही सोबत उबदार कपडे आणले होते. ते परिधान करून सर्वत्र भटकंती केली व आनंद लुटला.***
>
> **–अभिजित लोभी, पर्यटक, मुंबई**

# नानासाहेब पेशवे यांच्या जन्मस्थळी स्पंदने जाणवतात -अविनाश धर्माधिकारी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वेणगाव येथे जन्मलेले नानासाहेब पेशवे दुसरे यांचे जन्मस्थळ पाहिले. या गावात भारतमातेचा थोर सुपुत्र जन्माला आला. इंग्रजांच्या विरोधात स्वातंत्र्य समर उभे करण्याचे काम त्यांनी केले. आज या भूमीत हवेतून निर्माण होणारी स्पंदने मी अनुभवली, असे उद्गार राज्याचे माजी उपसचिव आणि चाणक्य मंडळ परिवाराचे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांनी केले.

स्वातंत्र्य सेनानी नानासाहेब पेशवे स्मारक समिती आणि श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ यांच्या विद्यमाने नानासाहेब पेशवे यांच्या द्विशताब्दी जयंती सोहळ्याचे आयोजन वेणगाव येथील श्री महालक्ष्मी मंदिराच्या प्रांगणात करण्यात आले होते.




त्या वेळी माजी सनदी अधिकारी धर्माधिकारी बोलत होते.

या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड यांच्यासह भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाई गायकर, रमेश मुंढे, नितीन कांदळगावकर, सुधीर थोरात, मोहन शेट्ये, पुष्कर पेशवे, भाजप तालुका अध्यक्ष राजेश भगत आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

अविनाश धर्माधिकारी म्हणाले, इतिहास लिहिला जात असताना मोगलांवर पानेच्या पाने पुस्तकात भरलेली आहेत. राजपूत, शीख, दक्षिणेतील विजयनगरचे साम्राज्य कृष्णदेवराय तसेच जे मराठे भारतभर लढले आणि जिंकले त्यांचा उल्लेख फार तुरळक आहे. राज्य मराठ्यांचे होते व ती प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजांची होती. त्यामुळे मोगलांचे उदात्तीकरण थांबवायला हवे.

शिवरायांच्या काळात हिंदवी स्वराज्यात सर्व जाती, धर्मांचे लोक एकत्र आणि गुण्यागोविंदाने नांदत होते. महाराजांचे हेच काम आपल्याला देशासाठी पुढे न्यायचे आहे, असेही धर्माधिकारींनी या वेळी नमूद केले. **(पान २ वर..)**

### स्मारकासाठी आम्ही प्रयत्नशील –आमदार प्रशांत ठाकूर

आमदार प्रशांत ठाकूर यांनी, या वेणगावमध्ये नानासाहेब पेशव्यांचा जन्म झाला हे आपले सर्वांचे भाग्य आहे. त्यांचे भव्य स्मारक झाले पाहिजे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे सांगितले. आमदार महेंद्र थोरवे यांनीही अध्यक्षीय मनोगतात नानासाहेबांचे भव्य स्मारक व्हावे याकरिता लागणारी तीन ते पाच एकर जमीन उपलब्ध करून देण्यासाठी व हे स्मारक लवकरात लवकर कसे होईल यासाठी आम्ही पाठपुरावा करू, असा शब्द दिला.

# ‘वेड इन इंडिया’चा पर्यटन वाढण्यास फायदा होईल -पंतप्रधान नरेंद्र मोदी

**जयपूर : वृत्तसंस्था**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि. ९) जयपूरमध्ये होत असलेल्या रायझिंग राजस्थान ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिटचे उद्घाटन केले. या संमेलनाचा उद्देश स्थानिक गुंतवणूक वाढीस चालणे देणे हा असून या वेळी उपस्थितांना संबोधित करताना ‘वेड इन इंडिया’ घोषणेचा राज्यातील पर्यटन वाढण्यास फायदा होईल, असे मत पंतप्रधान मोदींनी व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागील काही काळापासून वेड इन इंडिया संकल्पनेवर भर देताना दिसत आहेत. देशातील नामांकित जोडपी लग्न सोहळा परदेशात आयोजित करतात. या पार्श्वभूमीवर सरकारकडून वेड इन इंडियाचा प्रसार केला



जात आहे. या अंतर्गत बाहेरच्या देशात होणारे भारतीयांचे लग्न समारंभ देशातच केले जावेत, जेणेकरून भारतीय अर्थव्यवस्थेला त्याचा फायदा होईल, असे आवाहन केले जात आहे.

संमेलनात उपस्थित गुंतवणूकदारांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी देशातील नागरिकांना ‘वेड इन इंडिया’चे आवाहन केले आहे. याचा फायदा निश्चित होईल. राजस्थानमध्ये हेरिटेज टुरिझम, फिल्म टुरिझम, इको टुरिझम, रुरल टुरिझम, बॉर्डर एरिया टुरिझम हे वाढवण्याच्या अनेक शक्यता आहेत. या क्षेत्रांमधील तुमची गुंतवणूक पर्यटन क्षेत्राला बळ देईल आणि तुमचा उद्योगदेखील वाढवेल.

देशाच्या अर्थव्यवस्थेसंबंधी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, तुम्हाला सगळ्यांना ग्लोबल सप्लाय आणि व्हॅल्यू चेनशी संबंधित अडचणी महिती आहेत. आज जगाला एका अशा अर्थव्यवस्थेची आवश्यकता आहे, जी मोठ्यात मोठ्या संकटाच्या काळातदेखील मजबुतीने चालत राहिल. यासाठी भारतात व्यापक मॅन्युफेक्चरिंग बेस उभारणे आवश्यक आहे. हे फक्त भारतासाठी नाही तर जगाच्या अर्थव्यवस्थेसाठीही महत्त्वाचे आहे.

भारताने मॅन्युफॅक्चरिंगमध्ये आत्मनिर्भर होण्याचा संकल्प केला आहे. भारत मेक इन संकल्पनेनंतर लो कॉस्ट मेन्युफेक्चरिंगवर भर देत आहे. भारताचे पेट्रोलियम प्रोडक्ट, औषधे आणि लसी, इलेक्ट्रॉनिक साहित्य याच्या विक्रमी मॅन्युफॅक्चरिंगमुळे जगाला मोठा फायदा होत आहे. राजस्थानमधूनही गेल्या वर्षी ८४ हजार कोटींची निर्यात झाली आहे, यामध्ये इंजीनियरींग गुड्स, जेम्स अँड ज्वेलरी, टेक्सस्टाईल, हँडिक्राफ्ट आणि शेतीसंबंधी उत्पादनांचा वाटा देखील मोठा आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

भारतात उत्पादन वाढवण्यामध्ये पीएलआय योजनेचा सहभागदेखील वाढत आहे. सध्या इलेक्ट्रॉनिक्स, स्पेशालिटी स्टील, ऑटोमोबाईल्स आणि ऑटो कंपोनंट्स, सोलार पीव्हीज, फार्मासुटीकल ड्रग्ज या क्षेत्रांमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे. या योजनांमुळे किमान सव्वा लाख कोटींची गुंतवणूक आली आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

# मितेष पाटीलच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा देण्याची मागणी

## गडब येथे नागरिकांचा कॅण्डल मार्च

**पेण : प्रतिनिधी**

मितेष पाटीलच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा मिळावी व त्याच्या कुटुंबियांना न्याय मिळावा अशा एकमुखी मागणी व प्रशासनाकडे या घटनेचा जाहीर निषेध नोंदविण्यासाठी संविधानात्मक मार्गाने गडब येथे कॅण्डल मार्च काढण्यात आला होता. यामध्ये पुरुष, महिला, तरुण नागरिक सहभागी झाले होते.




अलिबाग समुद्रकिनारी ०१ डिसेंबर रोजी रात्री मितेष याची धारदार हत्याराने आक्षी येथील गुन्हेगारांनी निर्घृणपणे हत्या केली. मितेशच्या कुटुंबियांना न्याय मिळावा व प्रशासनाकडे या घटनेचा जाहीर निषेध नोंदविण्यासाठी काढण्यात आलेल्या या कॅण्डल मार्चवेळी जि.प.चे माजी सभापती संजय जांभळे, माजी सदस्य प्रभाकर म्हात्रे, गडब सरपंच मानसी पाटील, उपसरपंच दीपक कोठेकर, शिवसेनेचे जिल्हा समन्वयक नरेश गावंड, शिवसेनेचे पेण विधानसभा समन्वयक समिर म्हात्रे, शिवसेनेचे उपतालुका प्रमुख हिराजी चोगले, डोलवी ग्रामपंचायतीचे सरपंच परशुराम म्हात्रे, भाजपचे युवा नेते ललित पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस परशुराम मोकल, मनसेचे तालुका अध्यक्ष मनोहर पाटील, युवासेनेचे कासु विभाग प्रमुख निशांत पाटील, माजी सरपंच अपर्णा कोठेकर, विजय पाटील, माजी उपसरपंच तुलशीदास कोठेकर, दिनेश म्हात्रे, मानव अधिकारी समितीच्या पेण तालुका अधक्षा अश्विनी ठाकूर, आदर्श युवा संघटनेचे संचालक के.पी. पाटील, अध्यक्ष के.जी. म्हात्रे, सचिव कमलेश ठाकूर आदींसह हजारो नागरिक सहभागी होते.

या वेळी या निघृण हत्येचा निषेध व्यक्त करुन मितेषला न्याय मिळाला पाहिजे, आरोपींना कठोर शिक्षा व्हायला पाहिजे व हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा अशी मागणी करुन यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे उपस्थितांनी मितेशला श्रध्दाजंली वाहताना सांगितले.

# ‘ध्वज दिनी निधी संकलन हे मोठे देशकार्य’

**रायगड : रामप्रहर वृत्त**

देशाच्या सीमेचे रक्षण करण्यासाठी सैनिक कायम कार्यरत असतात. या सैनिकांच्या मदतीसाठी ध्वज दिन निधी संकलन करणे हे एक मोठे देशकार्य आहे. त्यामुळे जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहोचून सैनिकांसाठी भरघोस निधी जमा करावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी केले आहे .

जिल्हाधिकारी कार्यालययातील नियोजन भवन येथे ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ २०२४ करण्यात आला. या वेळी अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क रविकिरण कोले, जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप,



जिल्हा उद्योग केंद्र, महाव्यवस्थापक जी.एस. हरळय्या, शिक्षणाधिकारी (प्रा) पुनिता गुरव, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, कर्नल राहुल माने (निवृत), ॲडमिरल रामदास (लक्ष्मी नारायण परम विशीष्ट सेवा मेडल) पत्नी ललिता रामदास आदी उपस्थित होते.

यावेळी रायगड जिल्ह्यातील युद्ध विधवा, वीर माता/वीर पिता, वीर पत्नी व सेना मेडल धारकांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. याशिवाय सढळ हाताने निधी देणारांचा सत्कार तसेच माजी सैनिकांच्या पाल्याना शैक्षणिक शिष्यवृत्ती आर्थिक मदत आणि सन २०२३-२४ ध्वजदिन निधी संकलनाचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल विविध कार्यालयांना विशेष गौरवचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.

भारतमातेच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहूती देऊन सर्वोच्च बलिदान दिले अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करुन त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी तसेच युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी या निधीचा वापर केला जातो.

# वनराई बंधारे ठरताहेत शेतकरी आणि पशू-पक्ष्यांसाठी वरदान!

**खोपोली : प्रतिनिधी**

वनराई बंधारा बांधून ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग भाजीपाल्याचे उत्पादन घेते.गुरांच्या पिण्याच्या पाण्यांचा प्रश्न मार्गी लागत असतो.यामुळे वनराई बंधारे शेतकरी आणी पशू पक्षी साठी वरदान ठरत आहे. यामुळे गाव पातळीवर बंधारा बांधून पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबविणे काळाची गरज आहे.

पावसाळा संपताच पाण्याचे विविध स्त्रोत्र तळ गाठत असतात.मात्र काही ठिकाणी हेच पाणी आपण अडवू शकतो.उन्हाळा आला की आपल्याला पाण्याचे महत्व समजते



विहीर,तलाव,कूपनलिका,ओढे असे पाण्याचे असलेले स्त्रोत्र तळ गाठण्याची स्थिती निर्माण करीत असतात.पाणी हे आपले जिवन आहे. जल है!तो हम है!अशा पध्दतीचे उच्चार सातत्याने करीत असतो मात्र ते आचरणात कोणीही आणत नाही तुरळक ठिकाणी बंधारे बांधून पाणी अडविले जाते.मात्र प्रत्येकांनी आपले नैतिक कर्तव्ये म्हणून पाणी अडविले पाहिजे.

पाण्याशिवाय कोणताही सजिव जिवंत राहू शकत नाही पशू,पक्षी,झाडे,मानव यासाठी पाण्याचा वापर मोठ्याप्रमाणावर होत असतो.यामुळे बंधारे यांचे महत्व जाणून घेवून पाणी अडविले पाहिजे.या पाण्याचा वापर गुरांची तहान भागविण्यासाठी तसेच जंगलातील प्राणी यांना पिण्यासाठी होत आहे. शिवाय शेतकरी वर्ग यावरती भाजी पाल्यांचे उत्पन्न घेतले जाते.यामुळे रोजगारांचा प्रश्न मार्गी लागत आहे.

# भारतीय पोर्ट ॲण्ड डाक मजदूर महासंघाची राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

भारतीय पोर्ट ॲण्ड डाक मजदूर महासंघाची राष्ट्रीय कार्यकारिणी ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर रोजी मुंबई पोर्टमध्ये झाली. या मिटिंगमध्ये देशातील सर्व बंदरातील पदाधिकारी उपस्थित होते.

बंदरातील वेतन करार लवकरात लवकर करा असा ठराव पास करण्यात आला. तशा प्रकारचे पत्र सर्व पोर्टचे चेअरमन आणि मंत्री महोदयांना दिलेला आहे. यामध्ये भारतीय मजदूर संघाला ७० वर्षे पूर्ण होत आहे. त्या निमित्ताने सर्व बंदरामध्ये संपर्क अभियान चालू आहे. संपर्क अभियानाची जोरदार उपक्रम सुरु आहेत. सदर मिटिंग मध्ये अनेक विषय मिटिंगमध्ये घेण्यात आलेले आहेत. या मध्ये पोर्टचे राहिलेले विषय ताबडतोब पत्रव्यवहार



करून त्याची अंमलबजावणी करावी असा ठराव झाला. १० बंदरातील कामगार प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते.

या वेळी महासंघाचे अध्यक्ष श्रीकांत रॉय, महामंत्री सुरेश पाटील, केंद्रीय नेते व महासंघाचे प्रभारी अण्णा धुमाळ, सहप्रभारी व्ही.एम. चावडा, कोषाध्यक्ष सुधीर घरत, विश्वस्त रवि पाटील, के.के. विजयन, विघ्नेश नाईक, समीर मुजुमदार, संजय धंदाळ, प्रभाकर उपरकर, स्नेहल मोरे, श्रेया शेळके, तीवरेकर असे अनेक प्रतिनिधी उपस्थित होते.

या वेळी वेतन करार समितीचे सदस्य सुरेश पाटील यांचा वेतन करार घडवून आणल्या बद्दल विशेष सत्कार करण्यात आला. संपर्क अभियानच्या माध्यमातून नागरिकांचे कर्तव्य, पर्यावरण संरक्षण संवर्धन, एकता, समता, बंधुता आदी मूल्यांचे जनजागृती करून ती तळागाळात पोहचविण्याचे काम सुरू असल्याचे महामंत्री सुरेश पाटील यांनी माहिती दिली.

# कर्जत वेणगाव येथे कोतवाल कुटुंबीयांचा यथोचित सन्मान

**माथेरान : प्रतिनिधी**

कर्जत-वेणगाव येथे नानासाहेब पेशवे यांच्या दोनशे व्या जयंती सोहळ्याच्या झालेल्या कार्यक्रमात माथेरान मधील स्वातंत्र्य सैनिक भाई कोतवाल यांच्या कुटुंबाचा सन्मान करण्यात आला. या वेळी त्यांच्या सुनबाई मेघा कोतवाल यांना सन्मानित करण्यात आले.

कर्जत वेणगाव येथील नाना साहेब पेशवे यांच्या दोनशे व्या जयंती सोहळ्याचे आयोजन नाना साहेब पेशवे स्मारक समिती आणि श्री शिवाजी रायगड स्मारक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने येथील श्री महालक्ष्मी मंदिराच्या प्रांगणात रविवारी (दि.८)सायंकाळी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात माथेरान मधील स्वातंत्र्य सैनिक भाई कोतवाल यांच्या कुटुंबाचा सन्मान करण्यात




आला. या वेळी कोतवाल यांच्या सुनबाई मेघा कोतवाल यांना सन्मानित करण्यात आले.

या वेळी राज्याचे माजी सचिव, माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर, कर्जत विधानसभा मतदार संघाचे आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, यांच्यासह भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, नाना साहेब पेशवे यांच्या द्विशताब्दी जयंती सोहळ्याचे उपाध्यक्ष भाई गायकर, समितीचे सचिव रमेश मुंढे, खजिनदार नितीन कांदळगावकर तसेच भाजप तालुका अध्यक्ष राजेश भगत, माथेरान भाजप शहर उपाध्यक्ष शुभाष भोसले आदी मान्यवर मंडळी या वेळी व्यासपीठावर उपस्थित होती.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पेणकरांनी वाहिली आदरांजली

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनी पेणच्या नागरिकांनी बाबासाहेबांना आदरांजली वाहिली.

या वेळी पेण येथील बुद्ध विहारात बुद्ध वंदना घेऊन शहरातील बाबासाहेबांच्या पुतळ्याला आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा सोनवणे, रिपब्लिकन नेते एम.डी. कांबळे, पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सीताराम कांबळे, शहराध्यक्ष प्रभाकर घायतळे, आगरी समाजाचे नेते भास्कर पाटील, बौद्धाचार्य रोहिदास गायकवाड, बहुजन विद्यार्थी संघटनेचे तालुकाध्यक्ष नागेश सुर्वे, संदीप सुर्वे, प्रकाश नागोठकर, नरेश भालेराव, विनोद जोशी, सिद्धांत घायतळे, प्रा. दामिनी घायतळे, दीपक सोनवणे, प्रकाश मोहिते आदींसह भीमसैनीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




पान १ वरुन

## नानासाहेब पेशवे यांच्या जन्मस्थळी स्पंदने जाणवतात -अविनाश धर्माधिकारी

मोहन शेट्ये यांनीही मनोगत व्यक्त केले. श्री शिवाजी रायगड स्मारक समितीचे अध्यक्ष विवेक सुर्वे यांनी प्रास्ताविक केले. समीर सोमणे यांनी सूत्रसंचालन केले, तर रमेश मुंढे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमात विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी समर गीते सादर केली. पुणे येथील रमणबाग मंडळाच्या तरुणींनी मैदानी खेळ सादर केले. श्री महालक्ष्मी देवस्थानच्या वतीने रंजन दातार, दीपक बेहरे, विवेक जोशी यांनी मान्यवरांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सन्मानित केले.

कार्यक्रमास महेश वैद्य, दिलीप गडकरी, प्रसाद पुरोहित, श्याम जोशी, हृषिकेश दातार, भालचंद्र जोशी, मिनेश मसणे, संदीप मैद यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# बदलापूर येथील ‘त्या’ सोसायटीचा वीजपुरवठा पूर्ववत

**कल्याण : प्रतिनिधी**

बदलापूर पश्चिमेतील प्राईम बालाजी हाईट्स या सोसायटीकडे वीजबिलाची दोन लाख ४६ हजार रुपयांहून अधिकची रक्कम थकीत आहे. रितसर नोटीस देऊन वीजपुरवठा खंडित केल्यानंतर सोसायटीकडून महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून दमदाटी झाल्याचा अपप्रचार झाला. या संदर्भात पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्यानंतर सोसायटी पदाधिकाऱ्यानीच टप्प्याटप्प्याने थकबाकी भरण्याची ग्वाही देत दीड लाख रुपयांचा धनादेश दिला. त्यानंतरच सोसायटीचा वीजपुरवठा पुर्ववत करण्यात आला आहे.

बदलापूर गाव पश्चिम येथे न्यू डीपी रोड परिसरात प्राईम बालाजी हाइट्स या सोसायटीला सामान्य वापरासाठी (लिफ्ट, अंतर्गत पथदिवे आणि पाणीपंप) महावितरणने मे २०१८ मध्ये वीजपुरवठा दिला आहे. मार्च-२०२४ नंतर सोसायटीने या वीजजोडणीचे बिल भरलेले नाही. थकीत वीजबिलाचा भरणा करण्याबाबत सोसायटी पदाधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. अखेर थकबाकी न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याबाबत लेखी नोटीसही बजावण्यात आली, परंतू सोसायटीने थकबाकीचा भरणा केला नाही. त्यामुळे सोसायटीचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.


शाखा अभियंत्यांनी या संदर्भात बदलापूर पोलीस ठाण्यात तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता सोसायटी पदाधिकारी बाबु तांबे व इतरांनी संपर्क साधून थकबाकी भरण्याचे मान्य केले. प्रत्येकी ७५ हजार रुपयांचे दोन धनादेश तातडीने देत उर्वरित थकबाकी लवकर भरण्याची ग्वाही सोसायटी पदाधिकाऱ्यांनी पोलिसांसमक्ष दिली. त्यानंतर सोसायटीचा वीजपुरवठा पुर्ववत करण्यात आला.

# देशाच्या प्रगतीत शास्त्रज्ञ, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे मोठे योगदान -डॉ. नागरगोजे

**खोपोली -प्रतिनिधी**

देशाच्या प्रगतीत शास्त्रज्ञ,शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे मोठे योगदान आहे. विद्यार्थी शिकत असताना मनात प्रश्न पडला पडले पाहिजेत. प्रश्न विचारल्यामुळे आपल्याला विषय समजते, असे माहिती विज्ञान शाखेचे डॉ.अमोल नागरगोजे यांनी विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले

केटीएसपी मंडळाचे प.पू.गगनगिरी महाराज इंटरनॅशन स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते.या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी विज्ञान शाखेचे डॉ.अमोल नागरगोजे,के.एम. सी कॉलेजच्या सेवानिवृत्त प्रा.डॉ.नलीनी रामास्वामी,निता शर्मा,केटीएसपी मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम,कार्यवाह किशोर पाटील, गगनगिरी इं.स्कूलचे अध्यक्ष दिनेश गुरव,राजू अभाणी,सह्याद्री विद्यालयाचे अध्यक्ष संजय पाटील, छत्रपती विद्यालयाचे अध्यक्ष भास्कर लांडगे उपस्थित होते.प.पू.गगनगिरी महाराज इंटरनॅशन स्कूलचे प्राचार्य गौरव तिवारी यांनी



उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

संशोधनात पाश्चिमात्य देश पुढे असल्याचा समज आहे मात्र ३ ते ४ हजार वर्षापूर्वीपीसून भारत संशोधनात आहे.आपल्या देशातील नालंदा,ताक्षिणा युनिर्वसिटीत जगातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेत होते अशी माहिती विज्ञान शाखेचे डॉ.अमोल नागरगोजे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना दिली.

ज्यु कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी १९६० ते २०२०च्या दशकातील संगीताचे प्रात्यक्षीक करून दाखविले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर तयार केलेले प्रोजेक्टचे प्रमुख पाहुणे, पालकांनी कौतुक केले. प्रदर्शन यशस्वीतेसाठी प.पू.गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य गौरव तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली आहे.

# खारघरमधून अवैध गुटखा जप्त

## सहा पान शॉपवर छापे; गुटख्याची छुप्या पद्धतीने विक्री उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा, सुंगधीत तंबाखू, पान मसाल्याची साठवणूक करून त्याची छुप्या पध्दतीने विक्री करणाऱ्या खारघरमधील सहा दुकान आणि पान शॉपवर अंमली पदार्थ विरोधी पथकाने छापे मारले. यामध्ये हजारोंचा गुटखा आणि सुगंधीत तंबाखू, पान मसाल्याचा साठा जप्त केला आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाने सर्व दुकान आणि पान शॉप चालकांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करून सर्वांना ताब्यात घेतले आहे.




राज्य शासनाने गुटखा, सुगंधित तंबाखू, पान मसाला यासारख्या तंबाखुजन्य पदार्थाच्या उत्पादनांवर, त्याची साठवणूक करण्यांवर तसेच त्याची विक्री आणि वाहतूक करण्यावर बंदी घातली आहे, असे असतानाही नवी मुंबईतील अनेक पान शॉपमधून छुप्या पध्दतीने गुटखा आणि सुगंधीत तंबाखुची विक्री सुरू असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गुटख्याची विक्री करणाऱ्या पान शॉप आणि टपऱ्यांची झाडाझडती सुरू केली आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक निरीक्षक श्रीकांत नायडू आणि त्यांच्या पथकाने खारघर, सेक्टर-३ बेलपाडा मधील दिव्या कॉर्नर, राजेश टी., आच्छाद कम्युनिकेशन या ३ दुकानावर छापेमारी केली. त्यानंतर या तिन्ही दुकानांची तपासणी केली असता सदर तिन्ही दुकानांमध्ये हजारो रुपये किंमतीचा तंबाखुयुक्त पानमसाला आणि गुटखा आढळून आला. त्यामुळे अंमली पदार्थ विरोधी पथकाने या तिन्ही दुकानात सापडलेला गुटखा आणि सुगंधीत पान मसाल्याचा साठा जप्त केला आहे.

तिन्ही दुकानाचे मालक अनुज भगवानदिन साहु (वय २६), इंद्रा रमेश पाल (वय ३५) आणि धनंजय मातादीन गुप्ता (वय २४) या तिघांना ताब्यात घेतले आहे. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने खारघरमधील कोपरा परिसरातील ब्रम्हांड अपार्टमेंट लगत असलेल्या पानाच्या टपरीवर तसेच खान-पान शॉपवर त्याचप्रमाणे खारघर, सेक्टर- २ मधील गुरुप्रसाद पान शॉपवर छापे मारून त्यांची तपासणी केली.

या तिन्ही पान शॉपमध्येदेखील गुटखा आणि सुगंधीत तंबाखू पानमसाला आढळून आला. त्यामुळे अंमली पदार्थ विरोधी पथकाने या तिन्ही टपरी आणि पान शॉपचे मालक प्रमोद वुमार साहु (वय ३९), राजू नथ्थु खान (वय २७), सोनु अजयवुमार (वय २३) या तिघांना ताब्यात घेतले. दरम्यान, यापुढेदेखील अशाच पध्दतीने कारवाई सुरू राहणार असल्याचे अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# तळोजातील पाणी समस्येची लोकआयुक्त विभागाद्वारे दखल

## ३० डिसेंबर रोजी ऑनलाईन सुनावणी

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा परिसरात कमी दाबाने होणाऱ्या पाणी पुरवठ्याची दखल लोकआयुक्त विभागाने घेतली असून, उप लोकआयुक्त यांच्या समोर येत्या ३० डिसेंबर २०२४ रोजी सुनावणी होणार आहे. या सुनावणी वेळी ऑनलाईन उपस्थित रहावे, असे पत्राद्वारे महाराष्ट्र लोक आयुक्त विभागाकडून सिडको व्यवस्थापकीय संचालक आणि पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना कळविण्यात आले आहे.

तळोजा वसाहतीत गेल्या काही वर्षांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्यामुळे रहिवाशांना टँकरद्वारे पाणी विकत घेवून पाण्याची गरज पूर्ण कराकी लागत आहे. तळोजा वसाहतमधील पाणी समस्या दुर होण्यासाठी रहिवाशांनी सिडकोविरोधात तळोजा वसाहतीत अनेक वेळा मोर्चा काढला, आंदोलन केले, सिडको अधिकाऱ्यांच्या भेटी घेवून पाणी समस्या मार्गी लावण्यासाठी निवेदन दिले. तळोजा वसाहत मधील पाणी समस्या दुर होण्यासाठी निवेदन दिल्यानंतर पाणी साठा वाढवून दिला जाईल, असे आश्वासन सिडको अधिकारी देतात. त्यानंतर दोन दिवस सुरळीत पाणीपुरवठा होतो, मात्र त्यांनतर परिस्थिती 'जैसे थे' असल्यामुळे तळोजा वसाहतीच्या लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, परंतु सिडकोकडून पाणी वाढीसाठी कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केले जात नाहीत, असे लोकायुक्तांच्या निदर्शनास तळोजा वसाहत मधील रहिवासी राजीव सिन्हा यांनी पत्राद्वारे आणून दिले.

या पत्राची दखल घेऊन तळोजा वसाहत मधील पाणी समस्या संदर्भात येत्या ३० डिसेंबर रोजी लोक उपायुक्त यांच्याकडून तळोजा वसाहतमधील पाणी समस्या संदर्भात ऑनलाईन सुनावणी होणार आहे.

या सुनावणी वेळी उपस्थित रहावे, असे पत्राद्वारे लोकआयुक्त विभागाच्या कक्ष अधिकारी शुभांगी दुखंडे यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक तसेच पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता आणि राजीव सिन्हा यांना कळविले आहे.

# कोप्रोली-खोपटा पूल रस्ता खड्डेमुक्त करण्याची मागणी; अपघाताची सतत भिती

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील कोप्रोली-खोपटा पूल रस्त्यावर खड्ड्यांचे विघ्न पाहायला मिळते आहे. यामुळे कित्येक दुचाकीस्वार या रस्त्यावर पडते आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी रस्त्याचा अंदाज येत नसल्याने ही अडचण निर्माण होत आहे. विशेष म्हणजे साईट पट्ट्याच्या बाजूला तसेच गतिरोधक कळण्यासाठी जो रेडीयमयुक्त सफेद रंग द्यावा लागतो तोही देण्यात आलेला नाही. ही परिस्थिती कोप्रोली-खोपटापूल रोडवर नाही तर संपूर्ण उरण पूर्व विभागात पाहायला मिळत आहे.

एकीकडे खराब रस्ता तर दुसरीकडे रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे असलेले कंटेनर ट्रेलर यामुळे नागरीक मेटाकुटीला आले असून, या रस्त्यावर छोटे मोठे अपघात नागरिकांच्या पाचवीला पुजले आहेत. हा रस्ता सर्वसामान्य नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे. विशेष म्हणजे पावसाळ्या पूर्वी या रस्त्यावर खडी टाकण्यात आली होती ती खडी पावसामुळे व अवजड वाहतुकीमुळे वाहून गेलेली पाहायला मिळते आहे.

रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे खोपटा-कोप्रोली रस्त्याची दुरवस्था झालेली पहायला मिळत आहे. तर दुसरीकडे मोठ्या प्रमाणात होणारी जडवाहतुक, व रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे असलेले कंटेनर यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी नेमकं नक्की कुठून आणि कसे जायचे हाच प्रश्न सतावत आहे. अनेक दुचाकीस्वार पडणे अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे गंभीर दुखापत होऊन दुचाकी स्वारांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे, त्यामुळे लवकरात लवकर या प्रश्नांकडे लक्ष द्यावे, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

उरण पूर्व विभागातील खोपटा पूल हा कोप्रोली, पिरकोन, आवरे, गोवठणे, वशेणी, पाले, मोठी जुई, कळंबुसरे, चिरनेर पेण, अलिबाग तालुक्यातील गावांना उरण पश्चिम विभाग, उरण शहर, पनवेल, नवी मुंबई व मुंबईशी जोडणारा अविभाज्य घटक आहे.



एवढा महत्त्वाचा मार्ग असणाऱ्या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. कोप्रोली- खोपटापूल रस्त्यासाठी स्थानिक आमदारांनी निधी मंजूर केला होता. तीन कोटी ७५ लाखांच्या निधीतून नेमलेल्या ठेकेदारांनी रस्त्याचे डांबरीकरण व काम अंत्यत निकृष्ट दर्जाचे केले होते. रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या रस्त्याच्या दुरावस्थेवर प्रवासी नाराजी व्यक्त करीत आहेत. या रस्त्यावर अपघात वाढत असून जीव गमवावा लागेल, अशी भीती प्रवासी व्यक्त करीत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रवासांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

पूर्वी संबधित रस्त्यांचे काम एनएचएआयला हस्तांतरित करण्यात आले होते व त्यांच्या माध्यमातून रस्त्याचे काम करण्यात आले होते, मात्र आता खोपटा कोप्रोली रोडचे काम पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाला हस्तांतरित झाले आहे. विशेष म्हणजे खोपटा कोप्रोली रस्त्यावर होणारी जडवाहतुक पाहता, काँक्रीटीकरण केलेले रस्ते गरजेचे आहेत.

**खोपटा-कोप्रोली मार्ग पूर्व विभाग पेण-अलिबागला, मुंबई नवी मुंबई व पनवेलशी जोडणारा दुवा आहे. त्यामुळे नेहमी प्रवास करतो, मात्र या रस्त्याची दुरवस्था झाली आहे व खड्ड्यांचे विघ्न या रस्त्यावर पाहायला मिळते आहे. यामुळे कित्येक दुचाकीस्वार या रस्त्यावर पडत आहेत, विशेषता रात्रीच्या वेळी रस्त्याचा अंदाज येत नसल्याने ही अडचण निर्माण होत आहे. डांबरीकरण केल्यानंतर काहीच दिवसात रस्ते खराब होत असल्याचे पाहायला मिळत आहेत.**
**-केशव म्हात्रे, खोपटे, द.पी.पाडा**

**खोपटापूल दरम्यानच्या रस्त्यावर अवजड कंटेनर ट्रेलर वाहतुकीसह सतत वाहनांची वर्दळ असते. खड्डे पडत असल्याने येथील एक किमी रस्त्याचे नव्याने काँक्रिटीकरण करण्याचा सात कोटी रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली असून, सार्वजनिक बांधकाम खात्याने ही निविदा मंत्रालयात वर्क आर्डरसाठी पाठविण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गांवर लवकरच ठेके दारामार्फत काँक्रिटीकरणाचे काम करण्यात येणार आहे.**
**-नरेश पवार, उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, उरण**

# कलश शोभायात्रेला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सत्य संस्कृती चारिटेबल ट्रस्टतर्फे श्रीमद् भागवत कथेचे आयोजन नवीन पनवेल येथे करण्यात आले आहे. या वेळी कलश यात्रेचे आयोजन ७ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या कलश यात्रेला मोठ्या ससंख्येने महिला उपस्थित होत्या.



७ डिसेंबर ते १५ डिसेंबर रोजी सेक्टर दोन, अंबे माता मंदिर, नवीन पनवेल या ठिकाणी श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी मनोज कृष्ण जोशी श्रीमद् भागवत कथा सांगणार आहेत या निमित्ताने सात डिसेंबर रोजी नवीन पनवेल शिव मंदिर गुरुद्वारा ते सेक्टर दोन नवीन पनवेल येथे कलश शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेत ढोल ताशा पथक सहभागी झाले होते. हजारो महिलांनी कलश शोभायात्रेत सहभाग घेतला. या कलश शोभा यात्रेत नागरिकांनी देखील आपली उपस्थिती दर्शवली.

कलश यात्रा यशस्वी होण्यासाठी मानस परिवार सेवा ट्रस्ट सांताक्रुज, विक्रोळी, भांडुप, पलावा, चेंबूर, घाटकोपर यांचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच श्याम शाह, सुरेश चव्हाण, कांतीलाल वैष्णव यांनी यासाठी मेहनत घेतली. मानस परिवार सेवा ट्रस्टचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रमोद पांडे आणि पदाधिकाऱ्यांनी मनोज कृष्ण जोशी यांना वस्त्र अलंकार देऊन सन्मान केला.

# मेकरथॉन स्पर्धा २०२४मध्ये फुंडे हायस्कूलचे सुयश

**उरण : रामप्रहर वृत्त**

पिल्लई कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, पनवेल येथे गुरुवारी (दि.५) मेकरथॉन २०२४ या स्पर्धेमध्ये उरण तालुक्यातील फुंडे येथील तु. ह.वाजेकर विद्यालयाच्या माध्यमिक विद्यालय व जुनियर कॉलेज मधील विद्यार्थ्यांचे प्रत्येकी दोन गट सहभागी झाले होते.

माध्यमिक शाळा गटाच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी या ग्रुपचे मेंटर शिक्षक अस्मिता पाटील या मॅडम होत्या व त्यांच्या गटामध्ये श्रावणी जयदास कोळी, वैष्णवी अंकुश चव्हाण, गिरीश जालिंदर जगताप, वैभव अंकुश गुट्टे हे विद्यार्थी सहभागी होते या विद्यार्थ्यांना कॅटापलूझा हा विषय देण्यात आला होता. तर माध्यमिक गटाच्या क्रिएटिव्हिटी या ग्रुपचे मेंटर शिक्षक एसडी म्हात्रे हे होते त्यांच्या गटामध्ये नचिकेत सदानंद म्हात्रे, आदित्य संभाजी अस्वले, वीरश्री महेश म्हात्रे, वैभवी चंद्रविलास ठाकूर हे विद्यार्थी सहभागी होते या विद्यार्थ्यांना रोबोस्ट हा विषय देण्यात आला होता.

ज्युनिअर कॉलेजच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी या ग्रुपचे मेंटर शिक्षक पी. एस. ठाकूर या होत्या. यांच्या गटामध्ये हर्षद भास्कर चव्हाण, धोंडीराम भारत मिटकरी, तन्मय शैलेश घरत, भावेश दत्ताराम कडू हे विद्यार्थी सहभागी होते या विद्यार्थ्यांना ॲक्टिव्हिटी स्प्रिंग बोल्ट हा विषय देण्यात आला होता. तर कॉलेजचा दुसरा ग्रुप हा क्रिएटिव्हिटीचा होता याचे मेंटर शिक्षक भोजने सर होते. या ग्रुपमध्ये मोहन दादा वळकुंदे, पंकज मच्छिंद्र लवटे, मयुरेश राजेंद्र ढाकणे, महेश बापू घुटुकडे हे विद्यार्थी सहभागी झाले होते या विद्यार्थ्यांना eligant heights हा विषय देण्यात आला होता.



या विषयाचे अतिशय सुंदर मुलांनी मॉडेल बनवून त्याचे सादरीकरण केले म्हणून कॉलेजच्या क्रिएटिव्ह ग्रुपला दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांना साडेसात हजार रुपयांचे रोख रक्कम व मेंटर शिक्षक श्री भोजने सर यांना अडीच हजार रोख रक्कम, विद्यार्थ्यांना व शिक्षकांना ट्रॉफी व विद्यालयास ट्रॉफी अशा प्रकारचे पारितोषिक बक्षिसाच्या स्वरूपात प्राप्त झाले. या स्पर्धेमध्ये रायगड जिल्हा ठाणे जिल्हा व नवी मुंबई येथील CBSC, ICSE, व CONVENT शाळा सहभागी झाल्या होत्या.

स्पर्धेच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांना ऑडिटोरियममध्ये बसवून प्रत्येक विषयाची सखोल माहिती दिली व त्यानंतर विद्यार्थ्यांना कम्प्युटर लॅब मध्ये नेऊन त्यांना त्या project विषयी सखोल माहिती व वेगवेगळ्या प्रकारचे मॉडेल इंटरनेटच्या माध्यमातून बघण्यास सांगितले नंतर प्रत्येक ग्रुपला वेगवेगळ्या लॅब मध्ये नेऊन तेथे साहित्य देण्यात आले. विद्यार्थ्यांना मिळालेल्या साहित्यातून कमीत कमी साहित्य वापरून मॉडेल तयार करण्यास सांगितले. यामुळे विद्यार्थ्यांनी मेंटर शिक्षकांच्या मदतीने वेगवेगळ्या कल्पना तृप्त्या वापरून मॉडेल यशस्वीरित्या तयार केले.

हायस्कूल ग्रामीण भागातले असल्यामुळे सर्व स्तरातून विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. स्पर्धा यशस्वी होण्याकरता विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे, चेअरमन कृष्णाजी कडू यांचे मार्गदर्शन लाभले.

# रसायनी लायन्स क्लबतर्फे मोफत नेत्रतपासणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी लायन्स क्लबतर्फे पराडेवाडी येथे ७१ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली.

या तपासणीत १४ रुग्णांना मोतिबिंदूचा आजार असल्याचे दिसून आले. त्याच्यावर नायर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया पार पडणार आहे तसेच मुंबई लायन्स क्लबचे दिनेश रॉय यांच्या कुटूंबाचे वतीने १३० आदीवासी बांधवांना उबदार ब्लॅकेटचे वाटप करण्यात आले. आदीवासी बांधवांना ऐन थंडीत उबदार ब्लॅकेट मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसून आले.

या कार्यक्रमासाठी डिस्ट्रिक्ट लॉयन्स गव्हर्नर संजीव सुर्यवंशी, लॉयन्स गण्णाप्रा, लायन्स अलोक मेहता, लॉयन्स ज्योती देशमाने, नागेश देशमाने, खालापूर लॉयन्स किशोर पाटील आदीसह रसायनीकर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रसायनी लॉयन्स क्लबचे अध्यक्ष दत्तात्रेय जांभळे, लॉयन्स स्वप्निल जांभळे, राम जाधव, हरेश पाटील, नितीन पाटील, चेतन जाधव, अनिल जांभळे, राजेश जांभळे यांच्यासह पराडेवाडी ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी डिस्ट्रीक कायास गपीट- संजीव सूर्यवंशी, लॉयन गणात्रा लायन अशोक मेहता, जैन, पनवेल लॉयन ज्योती देशमाने, नागेश देशमाने, किशोर पाटील आदी उपस्थित होते.







**पनवेल : विधानसभा निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर सलग चौथ्यांदा विजयी झाल्याबद्दल पडघे गावचे माजी सरपंच तथा भाजप महापालिका प्रभाग क्र. २चे अध्यक्ष कृष्णा पाटील यांनी स्वखर्चाने गावातील 'लाडक्या बहिणीं'साठी चार ते पाच दिवसांची देवदर्शन सहल आयोजित केली होती. या सहलीचा लाभ १५० महिलांनी घेतला. तुळजापूर, अक्कलकोट, कोल्हापूर नरसोबाचीवाडी परिसरात ही सहल काढण्यात आली होती. या वेळी कृष्णा पाटील यांच्यासह माजी पं.स. सदस्य कुंदा पाटील, पवन भोईर, विद्यानंद पाटील, महेश भोईर, किशोर पाटील, कुवर पाटील, सुनील भोईर आदी उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सॉफ्ट स्किल व बिजनेस एटीक्वेट विषयावर सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.९) इंग्रजी विभाग व सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग अँड प्लेसमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने सॉफ्ट स्किल्स व बिझनेस एटीक्वेट्सवरती महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी सत्राचे आयोजन केले होते.



या सत्रासाठी ए.सी. पाटील अभियांत्रिक महाविद्यालयातील ह्युमॅनिटीज व बेसिक सायन्स विभाग प्रमुख प्रा. रतन कांबळे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल व मुलाखतीतील बारकावे तसेच वेगवेगळे एटीक्वेट्स या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. या सत्रासाठी महाविद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सत्राचा लाभ घेतला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या सत्रामध्ये सहभाग घेतल्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या सत्राचे आयोजन प्रा. डॉ. महादेव चव्हाण व प्रा. रेवन शिंदे यांनी केले तसेच प्रा. महेश धायगुडे, प्रा. रूपाली नागरेकर, प्रा. मनीषा शिलेदार, प्रा. योगिता पाटील तसेच विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## संपादकीय

# संघर्षात भरच!

तब्बल पन्नास वर्षांनी सीरिया या देशाच्या जनतेची असद कुटुंबाच्या एकाधिकारशाहीतून सुटका झाली असली तरी ही राजवट उलथवून टाकणाऱ्या बंडखोरांचे कट्टरपंथियांशीच संबंध असल्याने सीरियाच्या नागरिकांचे भवितव्य अद्याप तरी बिकटच दिसते आहे. दरम्यान, सीरियातील घडामोडींमुळे पश्चिम आशियातील समीकरणे मात्र नक्कीच बदलणार आहेत.

**इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धामुळे पश्चिम आशियातील संघर्षाने आधीच जगभराचे लक्ष वेधून घेतलेले असताना सीरियातील ताज्या घडामोडींमुळे पश्चिम आशियातील अशांततेत भरच पडण्याची शक्यता आहे. सीरियातील बंडखोरांनी तब्बल तेरा वर्षे चाललेल्या उठावानंतर रविवारी सीरियाचे अध्यक्ष बशर असद यांची राजवट उलथवून टाकली. इराण आणि रशियाच्या पाठिंब्याच्या जोरावर असद इतकी वर्षे आपली सत्ता टिकवून होते, परंतु रशिया युक्रेनसोबतच्या युद्धात गुंतलेला असल्याने आणि इस्रायलने खिळखिळ्या केलेल्या लेबनॉनमधील हेजबोला गटाला बळ देण्यात इराण कमी पडल्याने सीरियातील बंडखोरांना असद यांची राजवट उलथवून टाकणे शक्य झाले. परिस्थिती निवळल्यावर लोकनियुक्त सरकार सत्तेवर येईल असे बंडखोरांनी जाहीर केले असले तरी या घडामोडींनंतर सीरियात शांतता प्रस्थापित होऊन तेथे लोकशाही राजवट परतेल असे मात्र फारसे कुणाला वाटत नाही. उलट पश्चिम आशियातील युद्धसदृश परिस्थितीमुळे सीरियात आणखी अशांतताच निर्माण होण्याची शक्यता आंतरराष्ट्रीय राजकारणाचे तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. बहुतेक अरब राष्ट्रांमध्ये २०१० पासूनच्या दशकात सत्ताधीशांना खाली खेचण्याच्या उठावांचे पर्व सुरू झाले, मात्र या कथित क्रांतीमुळे तेथील देशांमध्ये जनतेचे राज्य काही आले नाही. उलट अशांतता आणि अस्थिरताच कायम राहिली. सीरियातील अध्यक्ष असद रशियाच्या आणि इराणचा पाठिंबा असलेल्या हेजबोलाच्या मदतीने बंडखोरांना थोपवू शकले, मात्र गेली दहाहून अधिक वर्षे सीरियात यादवी सुरूच राहिली. या काळात तेथे पाच लाखांहून अधिक सर्वसामान्य नागरिक मारले गेले आणि जवळपास ६० लाख लोक देशोधडीला लागले. बंडखोरांनी गेल्या काही दिवसांत सीरियात अनेक प्रांतांवर ताबा मिळवला. २७ नोव्हेंबरनंतर दक्षिणेकडील आणखी प्रांतांवर कब्जा करीत शनिवारी देशातील तिसरे मोठे शहर होम्स ताब्यात घेतले. अखेर रविवारी पहाटे दमास्कसही ताब्यात घेतल्याचे बंडखोरांनी जाहीर केले. सरकारच्या वाहिनीवरील बंडखोरांच्या घोषणेनंतर दमास्कसच्या उम्मियाद स्क्वेअरमध्ये नागरिकांनी मोठा जल्लोष केला. असदविरोधी घोषणाबाजी आणि गाड्यांच्या हॉर्नच्या आवाजांनी दमास्कसचे रस्ते दणाणून गेले. गेली सुमारे पन्नास वर्षे असद कुटुंबाची सीरियातील सत्तेवर पोलादी पकड राहिली. बंडखोरांनी राजवट उलथून टाकल्यावर असद यांनी देशातून पलायन केले असून बंडखोरांकडून सत्तास्थापनेच्या हालचाली सुरू आहेत. बंडखोरांनी कैद्यांची सुटका केल्याची घोषणाही केली. असद यांच्या सरकारने मोठ्या प्रमाणात उघडलेल्या स्थानबद्धता केंद्रांमध्ये नागरिकांचा छळ आणि बेकायदा हत्या झाल्याचे आरोप झाले आहेत. आता सीरियातून पलायन करून बशर अल असद नेमके कुठे गेले हे लगेच तरी कळू शकले नाही. बंडखोरांनी अध्यक्षांच्या प्रासादातही घुसून नासधूस केली. अनेक नागरिकही या प्रासादात घुसले आणि त्यांनीही तेथे मोडतोड केली. असद देशाबाहेर गेले आहेत की मारले गेले आहेत याविषयीही नागरिकांकडून शंकाकुशंका व्यक्त केल्या गेल्या. बंडखोरांनी सत्तास्थापनेच्या हालचाली सुरू केल्या असल्या तरी सीरियातील परिस्थिती कधी निवळणार याविषयी सगळेच साशंक आहेत. बंडखोरांचे कट्टरपंथीयांशीच संबंध आहेत. त्यामुळे सीरियात नवीन एकाधिकारशाहीच अस्तित्वात येण्याची शक्यता अधिक दिसते आहे.**

# महाड एसटी आगारात खासगी बसचालकांची मनमानी



**खबरबात**
**महेश शिंदे**

महाराष्ट्र एसटी महामंडळाच्या माध्यमातून काही खासगी बसेसदेखील ठेकेदारी पद्धतीने सुरू आहेत. या बसेसवरील चालकांच्या मनमानी कारभारामुळे एसटी प्रवाशांचे अतोनात हाल होताना दिसत आहेत. यामुळे अनेक एसटी बसेसची आरक्षण सुविधा रद्द करण्याची पाळी महाड एसटी बसस्थानकावर आली आहे.

महाराष्ट्र एसटी महामंडळाने खासगी तत्त्वावर काही गाड्या सुरू केल्या आहेत. या बसेस खासगी प्रवासी वाहतूक ठेकेदार कंपनीकडून घेण्यात आल्या आहेत. या बसेसवरील चालकदेखील खाजगी तत्त्वावर नेमण्यात आले आहेत. एसटी आगारामधील लांब पल्ल्याचा प्रवास या खासगी प्रवासी बसेस या खासगी ठेकेदारांना अधिकतम देण्यात आलेल्या आहेत. केली काही दिवसांपासून या खासगी बसेस वेळेत सुटत नसल्याने प्रवाशांचे हाल होताना दिसत आहे.

खासगी बसेसवरील चालक एसटी वेळापत्रकाच्या नियोजित वेळेत दाखल होत नसल्याने प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्यातच अनेक वेळा चालक उपस्थित राहत नसल्याने ज्या प्रवाशांनी आपली जागा आरक्षित केलेली असते त्या प्रवाशांना ऐनवेळी दुसरी बस पाहण्याची वेळ येते. यामध्ये प्रवाशांचा वेळ आणि पैसादेखील वाया जात आहे. यामुळे महाड एसटी आगाराच्या अनेक बसेसचे आरक्षण सुविधा रद्द करण्यात आली आहे. याचा त्रास प्रवाशांना बसत असला तरी खासगी ठेकेदारांचा वरिष्ठ पातळीवरील वरदहस्त असल्याने स्थानिक अधिकाऱ्यांना तोंडावर बोट ठेवण्याची पाळी येत आहे.

या बसेस अनेक वेळा प्रवासादरम्यान बंद पडतात, मात्र त्यांना पर्याय उपलब्ध करून देण्यात या ठेकेदारांकडून प्रयत्न केले जात नाहीत. अशावेळीदेखील प्रवाशांना भर रस्त्यात ताटकळत उभे राहावे लागत आहे. वेळेवर न येणारे चालक आणि इतर कारणांमुळे एसटीच्या खाजगी प्रवासी बसेसमधील प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत प्रवाशांनी अनेक वेळा तक्रारी नोंदविल्या आहेत, मात्र सदर बसेस पुरवठादार यांचा वरिष्ठ कार्यालयापासून वरदहस्त असल्याने स्थानिक पातळीवरील अधिकारी याबाबत पावले उचलताना हात आखडता घेत आहे. महाड एसटी आगारामध्ये जवळपास १७ बसेस या पद्धतीने कार्यरत आहेत.

धुळे, जळगाव, पुणे, अक्कलकोट, बोरिवली, यांसह पनवेल अशा लांब पल्ल्याच्या बसेस खासगी ठेकेदारांकडून चालवल्या जात आहेत. ४०० किलोमीटरचा प्रवास झाल्यानंतर या बसेसना ४७ रुपये प्रमाणे तर त्याबाहेर प्रवास झाल्यास ४४ रुपये दिले जातात, तर देण्यात येणाऱ्या डिझेलची रक्कम मात्र वजा केली जाते. महाड एसटी बसेस मधील बसेसचा सुमारे दीड ते दोन लाख किमीचा प्रवास होतो. याकरिता महाड एसटी आगाराकडून महिन्याला सुमारे ५० लाख रुपये या खासगी बसेसना दिले जातात.

महाड एसटी आगारामध्ये जवळपास १७ खासगी बसेस उपलब्ध आहेत. चालकांच्या बाबतीत यापूर्वी तक्रारी आल्या होत्या त्यानुसार विभागीय वाहतूक अधिकाऱ्यांना कळविले आहे. काही बसेसचे आरक्षण रद्द करण्यात आले आहे, असे महाड आगार व्यवस्थापक रितेश फुलपगार यांनी सांगितले.

# आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन

आज आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन. लोकांचे अधिकारांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी तसेच, जगभरातील नागरिकांच्या मानवाधिकारांप्रती जागरुकता निर्माण करण्यासाठी १९५० पासून १० डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवस म्हणून साजरा करण्यात येईल, असे संयुक्त राष्ट्रसंघटनेने स्पष्ट केले होते. या दिवसासाठी १० डिसेंबर हीच तारीख निवडण्यामागचं कारण म्हणजे १९४८ साली याच दिवशी जगभरातल्या नागरिकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने एक घोषणा पत्र जाहीर केले होते. हे घोषणा पत्र जगभरातल्या ५००पेक्षा जास्त भाषांत अनुवादीत आहे.




मानवी हक्कांचे महत्त्व आदर्शपणे ५३९ ईसा पूर्वमध्ये समजले. जेव्हा सायरस द ग्रेटच्या सैन्याने बॅबिलोन जिंकला. सायरसने गुलामांना मुक्त केले, सर्व लोकांना त्यांचा स्वतःचा धर्म निवडण्याचा अधिकार असल्याचे घोषित केले आणि वांशिक समानता प्रस्थापित केली. ही तत्त्वे सायरस सिलेंडर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेक्ड-क्ले सिलिंडरवर रेकॉर्ड केली गेली, ज्यांच्या तरतुदी मानवी हक्कांच्या सार्वभौमिक घोषणेच्या पहिल्या चार कलमांसाठी प्रेरणा म्हणून काम करतात. १२१५मध्ये मॅग्ना चार्टच्या प्रमोल्गेशनद्वारे ज्याने कायद्याचे राज्य ची कच्ची संकल्पना आणि सर्व व्यक्तींना परिभाषित अधिकार आणि स्वातंत्र्यांची मूलभूत कल्पना सादर केली, जी अनियंत्रित खटला आणि तुरुंगवासापासून संरक्षण देते. मॅग्ना चार्टापूर्वी, कायद्याचे राज्य, जे आता कोणत्याही आधुनिक लोकशाही समाजात सुशासनाचे मुख्य तत्त्व मानले जाते, एक दैवी न्याय म्हणून समजले जात होते.

आपले राष्ट्रीयत्व, निवासस्थान, लिंग, लैंगिक अभिमुखता आणि लिंग ओळख, राष्ट्रीय किंवा वांशिक मूळ, रंग, धर्म, भाषा किंवा इतर कोणत्याही स्थितीची पर्वा न करता मानवाधिकार हे सर्व मानवांसाठी महत्वाचे आहे. कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा छळ न करता आपल्या मानवी हक्कांसाठी आपण सर्व समान पात्र आहोत. यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

जगभरात दरवर्षी १० डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन साजरा केला जातो. १० डिसेंबर १९४८ रोजी प्रथमच संयुक्त राष्ट्र संघाने (UN) मानवाधिकार स्वीकारण्याची घोषणा केली, मात्र याची अधिकृतपणे घोषणा १० डिसेंबर १९५० रोजी करण्यात आली. १९५०मध्ये सर्व देशांना आमंत्रित केल्यानंतर सभेत ठराव ४२३ (V) पास केला आणि सर्व देशांना आणि संबंधित संस्थांना हा दिवस साजरा करण्याबाबत सूचित केले.

संयुक्त राष्ट्र संघाने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवाधिकारांचा सार्वत्रिक जाहीरनामा जारी करून प्रथमच मानवाच्या हक्कांबद्दल सांगितले. १९५० मध्ये सर्व देशांना आमंत्रित करण्यात येऊन या दिवसाची अधिकृत घोषित करण्यात आली होती. तेव्हापासून दरवर्षी १० डिसेंबर रोजी हा दिवस साजरा केला जातो. मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा ५०० हून अधिक भाषांमध्ये उपलब्ध आहे. त्याचवेळी भारतात २८ सप्टेंबर १९९३ पासून मानवी हक्क कायदा लागू झाला आणि १२ ऑक्टोबर १९९३ रोजी 'राष्ट्रीय मानवाधिकार आयोग'ची स्थापना झाली.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्य क्षेत्रातही काम करतो. या अंतर्गत नागरिकांना वेतन, एचआयव्ही एड्स, आरोग्य, बालविवाह, महिलांचे हक्क याबाबत जागरूक केले जाते.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# युपीआयमधून चुकीच्या खात्यात पैसे गेल्यास...




जर चुकून तुमच्याकडून चुकीच्या युपीआयद्वारे दुसऱ्या खात्यात पैसे जमा झाले तर? ते पैसे पुन्हा आपल्या खात्यात आलेच नाही तर? अशावेळी घाबरण्याची काहीही गरज नाही. टेन्शन घेऊ नका. काही ट्रिक्सच्या मदतीने आपल्या खात्यात पैसे जमा होतील. अज्ञात व्यक्तीकडे चुकून गेलेली रक्कम ४८ ते ७२ तासांच्या आत परत मिळवू शकता. या काही ट्रिक्समुळे आपल्याला कुठेही धाव घेण्याची गरज नाही. काही तासात पैसे खात्यात जमा होतील.

मोबाईल फोन आणि इंटरनेटमुळे आजकालचं जीवन सुखकर झालं आहे. प्रत्येक गोष्ट एका क्लिकमध्ये पुर्ण होतात. पैशांचं ट्रॅन्जेक्शनदेखील ऑनलाइनद्वारे झटक्यात पुर्ण होतात. बरेच लोक लहान-सहान पेमेंट करण्यासाठी युपीआयचा वापर करतात. युपीआय म्हणजे युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस. भारतातील जवळपास सर्व बँका युपीआय सुविधा देतात. पण अनेकदा चुकून वेगळ्याच खात्यात पैसे सेंड होतात. जर आपल्यासोबतही असं घडत असेल, तर अजिबात काळजी करण्याची गरज नाही. काही ट्रिक्सच्या मदतीमुळे आपलं काम सोपं होईल, आणि खात्यात पैसे जमा होतील.

जर युपीआयद्वारे चुकीच्या नंबरवर पैसे ट्रान्सफर झाले असतील तर, त्या नंबरवर कॉल करून पैसे परत करण्याची मागणी करा. तुम्ही त्यांना स्क्रिनशॉटदेखील दाखवू शकता. या पद्धतीद्वारे पैसे परत मिळण्याची शक्यता आहे. पण आशा कमी असली तरी, तुम्ही प्रयत्न करू शकता. कारण काही लोक चुकून आलेले पैसे परत देतात. तर काही देणं टाळतात.

जर तुम्ही चुकीच्या नंबरवर पैसे पाठवले असतील तर, लगेच युपीआय केअरशी संपर्क साधा. कस्टमर केअरशी संवाद साधून त्यांना संपुर्ण प्रकरण सांगा. याशिवाय तुम्ही तुमच्या बँकेच्या कस्टमर केअरला कॉल करून तुमची तक्रार मांडू शकता.

जर तुम्हाला ग्राहक सेवेकडून मदत मिळाली नाही तर, तुम्ही एनसीपीआय पोर्टलवर तक्रार करू शकता. यासाठी सर्वात आधी एनसीपीआयच्या अधिकृत वेबसाईटवर जा. त्यानंतर 'गेट इन कॉन्टेक्ट'वर क्लिक करा. यानंतर सर्व माहिती भरा. सबमिट करा. नंतर Dispute Redressal Mechanism निवडा. तक्रार विभागाखाली व्यवहाराचे डिटेल्स एंटर करा. ज्यामध्ये युपीआय ट्रान्झॅक्शनची तारीख, ईमेल आयडी आणि मोबाइल नंबर एंटर करा. जेथे कारण विचारले तेथे 'चुकीच्या पद्धतीने दुसऱ्या खात्यात ट्रान्सफर केलेले निवडा' यानंतर सबमिट करा.

# मराठी लेखक, सूचिकार शंकर दाते



**निमित्त**

शंकर गणेश दाते हे एक मराठी लेखक, सूचिकार होते. त्यांचा आज स्मृतीदिन (१० डिसेंबर, १९६४) आहे. इ.स. १८०० ते १९५० ह्या १५० वर्षांच्या कालखंडात प्रकाशित झालेल्या मुद्रित मराठी ग्रंथांची विषयवार सूची (मराठी ग्रंथसूची किंवा दातेसूची) त्यांनी दोन भागांत तयार करून प्रकाशित केली. ह्या दोन्ही खंडांत मिळून २६६०७ इतक्या मराठी ग्रंथांची नोंद झालेली आहे.

मराठी ग्रंथसूचीव्यतिरिक्त त्यांनी मराठी लोककथांचे संकलन केले आणि ग्रंथालयशास्त्रावर पुस्तके लिहीली. त्यांनी भारतीय साहित्याची राष्ट्रीय ग्रंथसूची १९०१-१९५१ भाग ३ ह्या ग्रंथातील मराठी विभागाचे संपादनही केले.

दाते ह्यांचा जन्म १७ ऑगस्ट, १९०५ रोजी रत्नागिरी येथे झाला. त्यांचे मूळ घराणे राजापूर तालुक्यातील अडिवरे येथील होते. त्यांचे वडील हे मुंबईच्या कुलाबा वेधशाळेत हेडक्लार्क ह्या पदावर काम करत होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी व्यापारात चांगले यश मिळवले, पण १९१४ साली त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर दाते ह्यांचे काका आणि मोठे बंधू ह्यांनी दाते ह्यांचा सांभाळ केला.

पुणे येथील स. प. महाविद्यालयातून दाते ह्यांनी मराठी आणि संकृत ह्या विषयात पदवीसाठी नाव नोंदवले होते. पण लोकसाहित्य ह्या विषयाची आवड निर्माण झाल्याने ते त्या विषयाकडे वळले आणि त्यांनी लोककथांचे संकलन प्रकाशित केले.

१९३४पासून त्यांनी मराठी ग्रंथसूचीचे काम हाती घेतले आणि एकट्यानेच काम करून १९६१ साली ते पूर्ण केले. त्यानंतर मराठी नियतकालिकांची सूची करण्याचे त्यांनी ठरवले होते. त्यासाठीची सामग्रीही जमवली होती, मात्र १० डिसेंबर, १९६४ रोजी वयाच्या साठाव्या वर्षी कर्करोगाने त्यांचे निधन झाले.

दाते यांनी १९३४ साली मराठीतील प्रकाशित ग्रंथांची विषयवार सूची करण्याचे काम हाती घेतले आणि २७ वर्षे खपून ते काम १९६१ साली पूर्ण केले. इ. स. १८०० ते १९५० ह्या १५० वर्षांतील मराठी ग्रंथांची विषयवार आणि शास्त्रीय पद्धतीने सूची करून त्यांनी प्रकाशित केली. तसे करताना दाते ह्यांनी सूचीत नोंदवलेले प्रत्येक पुस्तक पाहून मग त्याची नोंद करण्याचे धोरण स्वीकारले होते. मराठी ग्रंथसूची हे मराठी भाषेत कोणकोणत्या विषयावर कोणकोणते ग्रंथ प्रकाशित झाले हे जाणून घेण्यासाठीचे उपयुक्त साधन आहे.

मराठी ग्रंथसूचीत प्रत्येक ग्रंथाविषयी पुढीलप्रमाणे माहिती नोंदवलेली आढळते. ०१. ग्रंथकाराचे नाव, ०२. ग्रंथाचे नाव, ०३. आवृत्ती, ०४. प्रकाशनस्थळ, ०५. प्रकाशक, ०६. पृष्ठसंख्या, ०७. आकार, ०८. चित्रांची माहिती, ०९. मूल्य ह्या माहितीसोबतच मुद्रक आणि मुद्रणस्थळ ही माहितीही ह्या सूचीत नोंदवलेली आहे. तसेच ग्रंथाविषयीची महत्त्वाची इतर माहिती उदा. अनुवादित ग्रंथ असल्यास मूळ ग्रंथ, ग्रंथकार इ. टिपेत नोंदवलेली आहे. प्रत्येक ग्रंथाविषयीची ही माहिती ग्रंथ-वर्णन-कोश ह्या विभागात विषयवार विभागून दिली आहे.

नोंदींच्या वर्गीकरणासाठी ग्रंथालयशास्त्रात वापरण्यात येणारी मेलविल डयुई ह्यांची दशांश-वर्गीकरण-पद्धती वापरली आहे. काही ठिकाणी उदा. चरित्रे काही विशेष शीर्षकांचा वापर करून त्याविषयीचे सर्व ग्रंथ एकत्र सापडण्याची सोय केली आहे. उदा. शिवाजी महाराजांची सर्व चरित्रे. सूचीच्या प्रारंभी दशांश-वर्गीकरण-पद्धतीचे वर्ग आणि उपवर्ग यांची माहिती देण्यात आली आहे तसेच सूचीच्या शेवटी लेखकाचे नाव, ग्रंथाचे नाव, विशेष शीर्षक ह्यांच्या निर्देशसूची दिलेल्या असून त्यायोगे सूचीतील ग्रंथ शोधण्याची सोय करून दिलेली आहे. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : हिवाळी पर्यटनाचा हंगाम सुरू झाल्याने पर्यटक ताजे मासे घेणण्यसाठी किनाऱ्यावर येणाऱ्या बोटींची वाट पाहतात आणि ताज्या मासळीचा लीलाव घेऊन मस्त वार साजरा करतात.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यातील भारतीय सुपरफूड डायबिटिस रुग्णांसाठी वरदान

सुमारे ५००० वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, आशिया आणि मध्य अमेरिकेत ज्वारीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते. ज्वारी लोकांच्या आहाराचा प्रमुख भाग असायचा, पण आता त्याची जागा गव्हाने घेतली आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत कर्नाटकातील हुबळी येथे पिकवलेल्या ज्वारीची मागणी पुन्हा ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेत वाढली आहे.



भारतात आजही ज्वारीची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. सुरुवातीला ज्वारीची हिरवी पाने जनावरांना खायला दिली जातात. ज्वारीचे पीक तयार झाल्यावर ते धान्य म्हणून वापरले जाते. ज्वारी हे जगातील पाचव्या क्रमांकाचे धान्य आहे.

ज्वारी जितकी त्याच्या अप्रतिम चवीसाठी ओळखली जाते तितकीच ती त्याच्या पोषक तत्वांसाठी देखील ओळखली जाते. ज्वारी वजन कमी करण्यास मदत करते, तसेच मधुमेहींसाठी सुरक्षित धान्य असल्याच सांगितलं जातं. महत्त्वाचं म्हणजे ज्वारी हा घटक दाहक विरोधी असून त्यात कर्करोगविरोधी घटक देखील आहेत. म्हणूनच आज आपण 'सुपरफूड ऑफ विंटर' म्हणून ओळखले जाते.

**ग्लुटेन फ्री:** ज्वारी हे ग्लुटेनमुक्त धान्य आहे. याचा अर्थ ज्वारी खाणे बहुतेक लोकांसाठी सुरक्षित आहे. हे धान्य ग्लूटेन-असहिष्णु लोकांसाठीदेखील सुरक्षित आहे. हे इतर कोणत्याही भाज्या किंवा धान्यांशिवाय शिजवून खाऊ शकते. तसेच याचे पीठ तयार करुन भाकरी तयार केली जाते.

**पौष्टिक मूल्य :** ज्वारीमध्ये फायबर, कार्ब्स आणि प्रथिने यांसारखे महत्त्वाचे पोषक घटक असतात. त्यामुळे शरीराला आवश्यक ऊर्जा मिळते आणि पचन सुलभ होते. प्रथिनांच्या उपस्थितीमुळे पोट दीर्घकाळ भरलेले वाटते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

**जीवनसत्त्वे आणि खनिजे :** ज्वारीमध्ये व्हिटॅमिन इ६ भरपूर प्रमाणात असते. त्यात पोटॅशियम, कॅल्शियम आणि लोहासारखी शरीरासाठी आवश्यक असलेली खनिजे असतात. त्यांच्या उपस्थितीमुळेच ज्वारी आरोग्यासाठी फायदेशीर आहे. याद्वारे शरीराच्या दैनंदिन गरजा भागवल्या जातात.

**आरोग्यासाठी फायदेशीर :** ज्वारी खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते. हे खाल्ल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहते. त्यामुळे मधुमेहींसाठीही ते फायदेशीर आहे. ज्वारी व्हिटॅमिन बी सह अनेक पोषक तत्वांनी समृद्ध आहे. हे चयापचय सक्रिय करते आणि मज्जातंतू पेशींच्या विकासास मदत करते. यामुळे त्वचा आणि केस निरोगी राहतात. मॅग्नेशियमसारख्या महत्त्वाच्या खनिजांमुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो आणि हृदयाचे आरोग्य चांगले राहते. याशिवाय ज्वारी खाण्याचे इतर कोणते फायदे आहेत?

# पोलादपूरमध्ये रानडुकरांचा उच्छाद

## शिकारीच्या परवानगीची मागणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

भातकापणीनंतर गवताचे भारे आणि भाताच्या मळणीनंतर भात भरडण्यासाठी देण्यापूर्वी भाताच्या बुंध्यातील मुळं खाण्यासाठी रानडुक्करांच्या झुंडी गावोगाव रात्री फिरत असून या रानडुक्करांपासून कोणतेही मोठे नुकसान होण्यापूर्वी शिकारीच्या परवानगीची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

भारतातील सुमारे १८ राज्यांमध्ये रानडुक्कर, माकड, नीलगायी, हरीण, काळवीट तसेच अन्य शेतीला उपद्रवी प्राण्यांच्या शिकारीस परवानगी आहे. राज्यात ही कृषी क्षेत्रातील उपद्रवी वन्यजीवांच्या शिकारीसाठी शेतकरीवर्गाने मागणी केली असुन शिकारीनंतर वन्यजीवांचे मांस भक्षण करण्यायोग्य असल्यास तशी कृती केल्यास त्यास कायदेशीर मुभा नैसर्गिक न्यायतत्वाने देण्यात यावी, अशी न्याय्य मागणी राज्याचे तत्कालीन वनमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे करण्यात आली होती . त्यानंतर (परिपत्रकातील सूचना क्रमांक ०२ वगळून) परवानगी देण्यास आदेश दिला आहे. शेतपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुक्कर आणि रोही म्हणजेच नीलगायी यांचा बंदोबस्त करण्याबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्याने आता पोलादपूर तालुक्यातील रानडुक्करांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवता येणार आहे.



सध्या सुरू असलेल्या मार्गशिर्ष महिन्यानंतर पुढच्या पंधरवडयात पौष पौर्णिमेपासून देव पारधीला जाणार असल्याच्या जुन्या रूढपरंपरेतून शिकार म्हणजेच पारध करण्याची परंपरा तत्कालीन दंडकारण्यात म्हणजे सध्याच्या महाड, पोलादपूर, महाबळेश्वर, जावळी, खेड, मंडणगड, दापोली अशा तालुक्यामध्ये पाहण्यास मिळते. या तालुक्यांच्या ग्रामीण भागांमध्ये सध्या रानडुक्करं, मोर, लांडोरी, रानकोंबडे, ससे, साळींदर, भेकर अशा वन्यजीवांची सर्रास पारध करण्याचा प्रकार गावपारधीच्या स्वरूपात सुरू होणार आहे. ग्रामीण भागातील ही परंपरा चिकन आणि मटनाच्या वाढत्या दरामुळे आता पुन्हा जनाधार मिळवू लागली असून उच्छाद घालणाऱ्या व झपाटयाने संख्या वाढणाऱ्या रानडुक्करांच्या शिकारीला पोलादपूर तालुक्यात तातडीने वनविभागाने परवानगी देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मात्र, इलेक्ट्रीक शॉक देऊन रानडुक्कर मारण्याच्या प्रयत्नात काही वर्षापूर्वी आदिवासी समाजातील तरूणाला नाहक जीव गमवावा लागल्याच्या घटनेनंतर बंदूकधारी शिकाऱ्यांमार्फत रानडुक्करांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

**माकडांचाही उपद्रव**

पोलादपूर शहर व परिसरातील गावांमध्ये माकडांचा हैदोस वाढल्याने पारंपरिक फळबागांद्वारे फलोत्पादन करण्याच्या व्यवसायाचा ऱ्हास झाला आहे, मात्र माकडांबाबत शिकारीऐवजी पिंजरा लावून माकडांना पकडून त्यांच्या नैसर्गिक अधिवासामध्ये म्हणजेच दूर जंगलात सोडण्याची मागणी शहर व परिसरातून करण्यात येत आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात बॉक्साईड वाहतुकीवर कारवाईची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात पुन्हा एकदा बॉक्साईड उत्खनन आणि वाहतुकीचे काम धडाक्यात सुरू असून डांबरीकरण केलेले रस्ते, ज्यांची वाहतुकीसाठी निर्धारित क्षमता २० ते २२ टन आहे, त्यावर ३० ते ३५ टन भरलेली डंपर गाड्या सुसाट वेगाने धावताना दिसत आहेत. यामुळे रस्ते लवकर उखडण्याची आणि अपघात होण्याची भीती व्यक्त नागरिकांकडून केली जात आहे.

श्रीवर्धन, हरिहरेश्वर आणि कुरवडे मार्गावर ज्या डंपर गाड्या ओव्हरलोड होत आहेत, त्या गाड्यांच्या सुसाट वेगामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठा धोका निर्माण होत आहे. . नुकत्याच घडलेल्या एका अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. सुसाट वेगाने धावणाऱ्या गाड्यांमुळे



काही दिवसापूर्वी हरिहरेश्वर येथील एक तरुण श्रीवर्धन येथे येत असताना कुरवडे येथे रस्त्यावर अपघात होऊन त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सुसाट वेगाने धावणा-या गाडीनेच त्याला धक्का दिल्याने तो मरण पावला असा अंदाज नागरिका व्यक्त करीतआहेत

या अपघाताच्या तपासात पोलिस प्रशासन अजून यशस्वी झालेले नाहीत, आणि संबंधित गाडी किंवा ड्रायव्हरला पकडण्यात पोलिसांना अपयश आले आहे.यामुळे स्थानिक नागरिक आणि समाजसेवक या प्रकरणावर प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अशी मागणी करत आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रस्ते आणि वाहतूक व्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. राज्य परिवहन विभाग आणि पोलिस प्रशासनाची लापरवाही या समस्येलाजवाबदार असल्याचा नागरिकांचा आरोप आहे . ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर व जबाबदार व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिक करीत आहेत.

# वातावरणातील बदलामुळे श्रीवर्धन तालुक्यात रुग्णांच्या संख्येत वाढ

## विविध शारीरिक समस्यांचा सामना

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात वातावरणात झालेल्या अचानक बदलामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. रात्री गुलाबी थंडी आणि दिवसा कडक उन्हामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.त्यातच कधी ढगाळ वातावरण. दक्षिणेकडील खराब हवामानामुळे ताप, सर्दी, खोकला आणि इतर विविध शारीरिक समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे.

वातावरणातील सतत बदलामुळे श्रीवर्धनमधील दवाखाने रुग्णांनी खचाखच भरलेले दिसत आहेत. औषधोपचार घेण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर दवाखान्यात जात आहेत. यामुळे आरोग्य सेवांचा ताण वाढला आहे. धुळीचे वातावरण, पर्यटकांची वाढती संख्या आणि वातावरणातील अन्य बदल यांच्या परिणामस्वरूप रुग्णांची संख्या कमी होण्याऐवजी वाढताना दिसत आहे.

सर्वसामान्य नागरिकांना यासाठी अधिक सावधगिरी आणि आरोग्य विषयक काळजी घेणे आवश्यक आहे. स्थानिक प्रशासनाने आणि आरोग्य विभागाने यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. नागरिकांनी रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी योग्य आहार घेणे, नियमित व्यायाम आणि संप्रेषणाच्या सर्व मार्गांवरून आरोग्यविषयक खबरदारी घेणे आवश्यक आहे.

# कर्जत तालुक्यात पशुगणनेचा शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात शेतकरी वर्गाकडे असलेल्या पशूंचीगणना करण्यास सुरुवात झाली आहे.या पशू गणनेमध्ये सर्व पशू पालक यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन पशुवैद्यकीय विभागाने केले आहे.

राज्य शासनाचे पशुसंवर्धन विभागाने राज्यात पशू गणना कार्यक्रम हाती घेतला आहे.या २१ व्या पशुगणना कार्यक्रमाला कर्जत तालुक्यात सुरुवात झालेली आहे. पंचायत समिती कर्जत येथे पशुगणना करण्यासाठी २०२४ करीता निवडलेले प्रगणक यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. पंचायत समिती कार्यालय येथे गट विकास अधिकारी पंचायत समिती कर्जत सुशांत पाटील यांच्या उपस्थितीत प्रगणक यांना प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षण मध्ये पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत डॉ. मिलिंद जाधव तसेच गट विकास अधिकारी श्री. सुशांत पाटील यांनी पशुगणने साठी निवडलेल्या प्रगणक यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

सदर पशुगणना ही कर्जत तालुक्यातील सर्व गावे, गावा अंतर्गत वाडी, वस्ती, पाडे तसेच सर्व शहरी वॉर्ड मध्ये एकूण २० प्रगणक यांच्या मार्फत होणार आहे.तसेच यावेळी पशुगणना ही अँड्रॉइड मोबाइल अँप द्वारे, प्रगणक यांच्या द्वारे घरोघरी जावून होणार आहे.त्यात प्रगणक हे पशुधन जसे गाई, म्हैशी, शेळ्या, मेंढ्या, हत्ती, घोडे, वराह , कुक्कुट पक्षी यांची नोंद ठेवणार आहेत.त्याचवेळी इतर पशू यांच्या प्रजाती,जात, लिंग, संख्या आणि उपयोगानुसार संबंधित माहिती ही संकलित करून मोबाइल अँप मध्ये भरणार आहेत.जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी , डॉ. शामराव कदम व सहा. आयुक्त पशुसंवर्धन कर्जत डॉ. गिरीश बारडकर यांच्या मार्गदर्शाखाली कर्जत तालुक्यात पशुगणना होत आहे.२१ वी पशुगणना ही दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ हया कालावधीत होणार आहे.

**शेतकरी पशू पालक यांच्या घरो-घरी, गोठ्यात, हाउसिंग सोसायटी येथे भेट देणाऱ्या प्रगणक यांना पशुगणना संबंधित सर्व आवश्यक माहिती दयावी आणि प्रगणक यांना सहकार्य करावे.**
**सुशांत पाटील, गटविकास अधिकारी, कर्जत पंचायत समिती**

# अलिबागला रविवारी पत्रकारांसाठी कार्यशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग प्रेस असोसिएशनच्या वतीने राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलाईझर यांच्या सहकार्याने रविवारी ( दि. १५) अलिबाग येथे रायगड जिल्ह्यातील पत्रकारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

चिंतामणराव केळकर विद्यालय, चेंढरे - अलिबाग येथे ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत दैनिक लोकमत चे संपादक अतुल कुलकर्णी, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. सागर मुंदडा मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पत्रकारांनी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. या संदर्भात अधिक माहितीसाठी भारत रांजणकर ९२२६१५२४८९, राजेश भोस्तेकर ९८८१८७८७३२ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर यांनी केले आहे.

# श्रीवर्धनमध्ये वालाच्या शेंगांसाठी ढवळ्या पवळ्यासह शेतकऱ्यांची नांगरणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन परिसर, वाळवटी, दांडगुरी, दिवेआगर आदगाव वेळास तसेच इतर खेडेगावातील शेतकऱ्यांनी वालाच्या शेंगाच्या उत्पादनाकडे अधिक लक्ष वेधले आहे . त्यामुळे दर्जेदार व आधिक उत्पादन करण्यासाठी अथक परिश्रम करताना दिसत आहेत.



वालाच्या शेंगांची शेती सुरू करण्यासाठी आणि त्यांचा उत्पादन कालावधी पूर्ण होण्यासाठी साधारणपणे २-३ महिने लागतात. सर्वसाधारणपणे शेंग ८० ते १०० दिवसांमध्ये तयार होते.योग्य हवामान आणि मातीचे पोषण असलेले वातावरण हवे असते. ते पोषण वातावरण श्रीवर्धन तालुक्यात अनुकूल आहे.

वालाच्या शेंगांच्या चांगल्या उत्पादनासाठी योग्य खतांची वापरणे अधिक महत्वाचे आसते. त्यासाठी शेतकरी नायट्रोजन (छ) - मुळांच्या वाढीसाठी.तसेच फॉस्फरस (झ) - फुलांच्या व शेंगांच्या उत्पादनासाठी. त्याच प्रमाणे . पोटॅशियम (घ) - रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी याचा वापर शेतकरी करत आसताना दिसतात. उत्तम पिक यावे यासाठी शेणखत, वर्मी कंपोस्ट, आणि युरिया हे विविध खतांची संमिश्रण वापरले जाते शेतकरी वापरत आसतात. वालाच्या शेंगासाठी रोग आणि कीटक नियंत्रण आवश्यक आसतात. शेतकरी पेस्ट कंट्रोल - कीटक नियंत्रणासाठी 'ऑक्सी डेमिटन' किंवा 'लिंडा' सारखी कीटकनाशकं. यांची फवारणी करतात. फंगस नियंत्रण - 'बोर्गोन' किंवा 'सोप' वापरून फुलांच्या वेगवेगळ्या प्रकारांच्या ताणापासून बचाव करता येतो

वालाच्या शेंगांची निगा राखणे हे महत्वाची असल्याने शेतकरी वर्ग नियमितपणे पाणी देत आसतो मातीला ओलसर ठेवण्यासाठी तो सदैव प्रयत्न करत आसतो. ओलसर वातावरणात फुलांची आणि शेंगांची निगा ठेवण्यासाठी तो अथक परिश्रम करतो. औषधांची फवारणी योग्य वेळी करण्याचे काम शेतकरी वर्ग काळजीने घेत आसतो.

वालाच्या शेंगांची बाजारात खूप मागणी आसते. . हिवाळ्यात त्यांची विशेष मागणी वाढते. या शेंगांचे पोपटी, भाजी, चटणी, कोशिंबीर तसेच आरोग्याला फायदा होणारी विविध पदार्थ तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर याचा उपयोग खवय्ये करत आसतात. त्याचबरोबर वालाच्या शेंगांची बाजारभाव कमी-जास्त होण्याचा मुख्य कारण हवामानावर अवलंबून आसते.

वालाच्या शेंगांमध्ये खूप फायबर्स (रेशे) असतात, ज्यामुळे पचन प्रणाली मजबूत होतेअसते . तसेच शेंगांमध्ये प्रोटिन, आयीप आणि अँटीऑक्सिडंट्स असल्याने, ते शेंगा शरीराला ऊर्जा देता आसतात. ह्या शेंगांचा नियमित वापर हृदयाच्या आरोग्यासाठी लाभकारी ठरत आसतो. त्याच प्रमाणे मुख्य म्हणजे रक्तदाब नियंत्रित करण्याचे काम करते.

वालाच्या शेंगाचे उत्पादन शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आसते. आणि त्याचे योग्य पालन आणि निगा केल्याने शेतकऱ्यांना उत्तम उत्पादन मिळते त्यामुळे त्यानां आर्थिक फायदाही होत आसतो.

वालाच्या शेतीतील यशस्वी उत्पादनासाठी नांगरणीतील बैल जोडीचे महत्त्व अनमोल आहे. बळीराज्याच्या शेतकऱ्यांसाठी ही पारंपारिक पद्धत आजही अनिवार्य आहे, कारण बैल जोडीने नांगरणीची प्रक्रिया सुलभ होते आणि त्याचा फायदा शेतकऱ्यांना होते. कारण जमीनची चांगली मशागत होत आसते.

बैल जोडीने योग्य नांगरणी केल्याने मातीचा उत्खनन आणि वालाच्या शेंगांच्या मुळांची चांगली वाढ होते. आधुनिक उपकरणांच्या तुलनेत बैल जोडीने नांगरणी केल्याने शेतकऱ्यांची शारीरिक ऊर्जा जास्त खर्च होत नाही आणि त्यांचा आरोग्यही चांगला राहतो. बळीराज्याच्या पारंपारिक पद्धतीला वालाच्या शेतीत स्थान असून त्यातून शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्याची साधनं मिळते.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या १) श्री. एकनाथ रामदास म्हात्रे २) श्री. प्रदीप रघुनाथ म्हात्रे, या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. ज्याचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकती' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे-गव्हाण, ता पनवेल व जिल्हा रायगड**

| अनुक्रमांक | गट क्रमांक/ सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | २८५ | २/अ | ०-११-६० |
| २ | २८५ | २/ब | ०-१४-०० |
| ३ | २९५ | १ | ०-४१-६० |
| ४ | ३२९ | २/ब | ०-१६-८० |

तरी वरील सदरहू मिळकतींबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकत रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करावीत. याप्रमाणे, मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकतीं संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/१२/२०२४

सही /-
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले**
२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड. पिन कोड - ४००७०२.
मोबाईल नं. ७६६६०१०२९३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे मोहो, ता. पनवेल, जि. रायगड येथील जनार्दन चांगा पाटील यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**परीशिष्ट**
**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे मोहो, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| जनार्दन चांगा पाटील | १२८ | ७ | ०-१९-०० | ४.०६ |

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **२१ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/१२/२०२४

सही /-
**ॲड. विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email : vijaybhagat43@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - मोहपे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १०६ | ०-४६-६०<br>पो.ख. ०-१८-७०<br>**एकूण ०-६५-३०** | ५.७८ | १. श्री. दिनकर मारुती भोईर<br>२. श्री. किसन मारुती भोईर<br>३. श्री. राम मारुती भोईर<br>४. श्रीमती अनुसया लक्ष्मण भोईर<br>५. श्रीमती अरुणा अरुण म्हसकर<br>६. श्रीमती जयवंती लक्ष्मण भोईर उर्फ जयवंती जयवंत माळी<br>७. श्रीमती रेवती लक्ष्मण भोईर उर्फ सेजल संतोष ठाकूर<br>८. श्रीमती मिनाक्षी लक्ष्मण भोईर उर्फ मिनाक्षी चंद्रहास ठाकूर<br>९. श्रीमती मनिषा लक्ष्मण भोईर उर्फ मनिषा चंद्रकांत ठाकूर<br>१०. श्रीमती सरिता लक्ष्मण भोईर उर्फ सरिता भालचंद्र पवार |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०९/१२/२०२४.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१

## 'जाहीर नोटीस'

तमाम लोकांस या जाहीर 'नोटीसी'ने कळविण्यात येते की, **गृहलक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित'**, प्लॉट नं. आर.डब्ल्यू-७, एम.आय.डि.सी. वसाहत, प्रिया स्कूलजवळ, मोहोपाडा, ता. खालापूर, जि. रायगड (सदर सोसायटी) या सोसायटीच्या 'विशेष सर्वसाधारण सभे'मध्ये सोसायटीच्या दोन्ही इमारती पुर्नबांधणीकरीता देण्याचे निश्चित केले असून त्याप्रमाणें सोसायटीचे सर्व उपस्थित सभासदांनी एकमताने ठराव पारित केला आहे.

सबब आम्ही तमाम लोकांस कळवित आहोत की, आमचे सोसायटीच्या सध्याच्या दोन्ही इमारती पुर्णपणे पाडून टाकून त्याठिकाणी एम.आय.डि.सी. कडून आमचे भुखंडास उपलब्ध होणारा व असणारा संपूर्ण एफ.एस.आय. वापरुन नवीन आर.सी.सी. पध्दतीच्या इमारतीचे बांधकाम करण्याकरीता इच्छुक विकासक आणि अगर बिल्डर डेव्हलपर्स यांनी सदर 'जाहीर नोटीस' प्रसिध्द झाल्यापासून चौदा दिवसांचे मुदतीत आमचे सोसायटीच्या सदर इमारतींची पुर्नबांधणी करण्याकरीता आपापले प्रस्ताव (कोटेशन) सोसायटीच्या खाली नमुद केलेल्या पत्त्यावर पाठवावेत आणि अगर समक्ष आणून द्यावेत.

मुदतीनंतर आलेल्या प्रस्तावांचा (कोटेशन्स) कोणताही विचार केला जाणार नाही आणि अगर त्या आमचेवर बंधनकारक रहाणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी म्हणून ही 'जाहीर नोटीस' प्रसिध्द केली आहे.

वरील म्हणण्यास बाध न येता आम्ही असे जाहीर करतो की, आमचे सोसायटीस आणि अगर सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना कोणतेही विशेष कारण न देता उपलब्ध प्रस्तावापैकी कोणताही प्रस्ताव (कोटेशन) मंजूर करण्याचा आणि अगर नामंजूर करण्याचा संपूर्ण अधिकार व हक्क असेल याची कृपया सर्व लोकांनी नोंद घ्यावी.

सदर इमारतींची पुर्नबांधणी करण्याकरीता आपापले प्रस्ताव (कोटेशन) तयार करणेकामी आवश्यक असलेली कागदपत्रे व प्रस्ताव (कोटेशन) बनविण्याकरीताचे मुद्दे सोसायटीकडून नियुक्त केलेल्या पी.एम. सी. चे सदस्य श्री. चिंतामणी पुरंदरे यांचेमार्फत खाली दिलेल्या पत्त्यावर रक्कम रु.१,०००/- भरून प्राप्त करता येतील.

**श्री. चिंतामणी पुरंदरे** - पी.एम.सी. सदस्य
३/३, जेएन४, शांतीसागर सोसायटी,
सेक्टर नं. १०, वाशी, नवी मुंबई.

मोहोपाडा, ता. खालापूर.
तारीख: ०९/१२/२०२४.

**सही/-** चेअरमन | **सही/-** सेक्रेटरी | **सही/-** खजिनदार

**गृहलक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था लि.**
एम. आय. डी. सी. वसाहत, मोहपाडा, प्रिया स्कूल जवळ, प्लॉट नं.आर.डब्लू. ७, ता. खालापूर, जि. रायगड-४१०२२२

# नवी मुंबईत धुळीचे साम्राज्य

## शहरात पुनर्विकास इमारतींमुळे सर्वत्र प्रदूषण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत सध्या जीर्ण इमारतींच्या पुनर्निर्माणाची कामे अनेक ठिकाणी सुरू आहेत. ऐन दाट रहिवासी वस्तीत ही कामे सुरू असल्याने परिसरात धुळीचे साम्राज्य पसरत आहे. त्यात भर म्हणून दिवसभर गाड्यांचा खडखडाट सुरू असतो तर अनेक ठिकाणी रात्रीही कामे सुरू असल्याने रात्रीच्या नीरव शांततेत होणाऱ्या दणदणाटाने रहिवासी त्रस्त झाले आहेत. मनपा नियमांची पायमल्ली होत असेल तर कुठे तक्रार करायची हेच सामान्य लोकांना माहिती नसल्यामुळे मनपानेच गस्ती पथक ठेवावे, अशी मागणी होत आहे.



नवी मुंबईत सध्या ११ ठिकाणी जीर्ण इमारतींच्या पुनर्निमाण काम सुरू आहेत तर तेवढ्याच इमारतींचे प्रस्ताव मनपाकडे प्रलंबित आहेत. यात सर्वाधिक चार ते पाच काम वाशीत सुरू असून सीबीडी, नेरूळ, कोपरखैरणे आणि ऐरोलीतही कामे सुरू आहेत.

नवी मुंबईत अनेक ठिकाणी कालबाह्य तर काही ठिकाणी सिडकोनेच निकृष्ट काम केल्याने जीर्ण झालेल्या इमारतींचा प्रश्न गेल्या पंचवार्षिक मध्ये तांत्रिक बाबीमधून मुक्त झाल्याने ही कामे वेगाने सुरू आहेत. घरांच्या पुनर्निमाण काम तेथे राहणाऱ्या रहिवाशांसाठी जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. ही कामे होत असल्याने सध्या ज्या ठिकाणी कामे सुरू आहेत त्या ठिकाणी धुळीचे साम्राज्य झालेले असून दिवसभर ध्वनिप्रदूषण होत आहे.

नियमानुसार प्रकल्प चार वर्षांत पूर्ण होणे गरजेचे आहे, मात्र तांत्रिक अडचणींना सामोरे जाताना अनेकदा विलंब होतो. त्यामुळे मिळालेल्या वेळेत काम पूर्ण करण्याची विकासकाची धडपड असते. त्यामुळे रात्रीही कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असतात. या कामांबाबत त्या त्या ठिकाणच्या विभाग कार्यालयात तक्रार केली तर निवारण होते, मात्र सामान्य नागरिकांना नेमकी कुठे तक्रार करायची याची माहिती नसते. त्यात विकासकाशी कोण शत्रुत्व घेणार, अशी नागरिकांची सावध भूमिका असल्याची माहिती वाशीतील एका रहिवाशाने नाव प्रसिद्ध न करण्याच्या विनंतीवरून दिली.

> **शहरात बांधकाम करताना आसपास कोणाला त्रास होऊ नये याची खबरदारी विकासकाने घेणे आवश्यक आहे. त्याबाबत निकष ठरलेले आहेत. जर कोणी नियमबाह्य काम करत असेल तर संबंधित विभाग कार्यालयात तक्रार करता येते.**
>
> **-सोमनाथ केकाण,**
> **सहाय्यक संचालक नगररचना**

# गोरक्षकांनी पकडले ८०० किलो गोमांस

**नवी मुंबई : बातमीदार**

कल्याण-शिळफाटा रस्त्यावरून रविवारी (दि.८) पहाटे गोमांसाची तस्करी करणारे वाहन नवी मुंबईतील बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पकडले. तब्बल ८०० किलो गोमांस यात असल्याचे तपासणीत उघड झाले आहे.

गो रक्षकांनी याबाबतची माहिती डायघर पोलीस ठाण्यात देत तक्रार नोंदवली असून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. याप्रकरणी तस्करी करणाऱ्या मोहम्मद रुस्तम यास पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती बजरंग दलाचे नवी मुंबई जिल्हा सह संयोजक तेजस पाटील यांनी दिली.



तस्करी होणार असल्याची गुप्त माहिती नवी मुंबई बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे त्यांनी कल्याण-शिळफाट्यावर पाळत ठेवली. रविवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास मिळालेल्या वर्णनाचे वाहन त्यांना दिसताच त्यांनी हे वाहन थांबवून तपासणी केली असता त्यात ७०० ते ८०० किलो वजनाचे गोमांस अढळून आले. त्यावर बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी मांसाचा साठा जप्त करत मांस तस्करी करणाऱ्या मोहम्मद रुस्तम याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. त्याच्याविरोधात डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या मोहिमेत सहभागी झालेल्यांमध्ये नवी मुंबई बजरंग दलासह संयोजक तेजस पाटील, रबाळे येथील प्रखंड सह संयोजक ओमकार पवार, वाशी येथील प्रखंड सह संयोजक अजय गुप्ता, करण पांडे, गोरक्षक प्रतीक माळी, आशिष धावले व इतर कार्यकर्त्यांचा समावेश होता.

# डीपीएस तलावावरील बेकायदेशीर रस्ता फ्लेमिंगोसाठी ठरतोय धोकादायक


**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील नेरूळ येथील ३० एकर डीपीएस फ्लेमिंगो तलावावरील वादग्रस्त रस्ता आणि आंतरभरतीचे पाणी अडवल्यामुळे दुहेरी धोके आहेत.

राज्य सरकारच्या तपास पथकाला असे आढळून आले की, खारफुटी आणि पाणथळ जमीन यामधील ६०० मीटरचा रस्ता पर्यावरणाचा नाश होण्यास प्रोत्साहन देईल, असे नॅटकनेक्ट फाऊंडेशनने म्हटले आहे. नॅटकनेक्टने यापूर्वी केंद्र तसेच राज्य सरकारांकडे तक्रार केली होती की सिडकोने बांधलेला रस्ता सीआरझेड नियमांचे उल्लंघन करतो ज्यामुळे खारफुटीच्या ५० मीटरच्या परिघात कोणत्याही बांधकामास बंदी आहे.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीला या समस्येची चौकशी करण्यास सांगितले. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठ्या शहरांवर नियंत्रण ठेवणाऱ्या नगरविकास विभाग-१ ला चौकशीचे निर्देश दिले.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील एका पथकाने ३ डिसेंबर रोजी तलाव परिसराला भेट दिली आणि त्याचा पंचनामा अहवाल नोंदविला हा रस्ता रद्द करण्याची सूचना केली कारण त्यामुळे खारफुटीचा नाश आणि तलावाचे अतिक्रमण होऊ शकते.



नवी मुंबई एन्व्हायर्नमेंटल प्रिझर्व्हमेंट सोसायटीचे संदीप सरीन यांनी सांगितले नेरूळ जेट्टी विकसित करण्यासाठी सिडकोने सांगितलेल्या रस्त्याला कार्यकर्त्यांनी विरोध केला नव्हता, पण आता सिडकोचे डिझाइन्स समोर येत आहेत, असे ते म्हणाले, आम्ही कधीही विचार केला नव्हता की हा रस्ता फ्लेमिंगो तलावासाठी धोकादायक ठरेल.

या रस्त्यानेच ठाणे खाडीला जोडणाऱ्या लगतच्या नाल्यातून तलावाकडे जाणारा आंतरभरतीचा पाण्याचा प्रवाह रोखला आहे, असे कुमार म्हणाले. म्हणूनच तपास पथकाचा अहवाल आमच्या चिंता पुष्टी करतो, तो म्हणाला.

मे महिन्यात साफ करण्यात आलेल्या रस्त्याखालच्या जलवाहिन्याही पुन्हा खोळंबल्या होत्या, असे कुमार म्हणाले. आता मॉस आणि चिखल असलेल्या तलावातील साचलेल्या पाण्यामुळे ते फ्लेमिंगोसाठी अनुकूल नाही, असे त्यांनी सांगितले आणि स्थलांतरित पक्ष्यांचा हंगाम सुरू झाला असून ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यात गुलाबी पक्ष्यांचे आगमन सुरू होईल.

फ्लेमिंगो मोठ्या संख्येने भेट देणारे तलाव वाचवण्यासाठी राज्य सरकारने एक उच्चस्तरीय समिती नेमली असतानाही ही नाश अत्यंत त्रासदायक आहे, ते म्हणाले. पक्षी साधारणपणे खाडीतील भरतीच्या वेळी डीपीएस फ्लेमिंगो लेक, एनआरआय आणि टीएस चाणक्य पाणथळ प्रदेशात उडतात.

डीपीएस तलावात फ्लेमिंगोच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या वर्षी जुलैमध्ये समिती नेमली होती. फ्लेमिंगो मृत्यू प्रकरण राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणमध्ये पुनरावलोकनाधीन आहे ज्याने मीडिया रिपोर्ट्सची स्वतःहून दखल घेतली आहे. नॅटकनेक्ट फाऊंडेशनने एनजीटीकडे आपली चिंता व्यक्त करत हस्तक्षेप अर्ज दाखल केला आहे.

सिडकोच्या विकास आराखड्यात भविष्यातील विकासासाठी डीपीएस फ्लेमिंगो लेक निश्चित केल्याचे निदर्शनास आणून देताना, कुमार यांनी सरकारला सिडकोच्या योजना नाकारण्याचे आणि शहराच्या जैवविविधतेचा भाग म्हणून फ्लेमिंगो डेस्टिनेशन जतन करण्याचे आवाहन केले.

शहराच्या पाणथळ प्रदेशांचे संवर्धन करणेदेखील महत्त्वाचे आहे कारण ते नैसर्गिक पूर-विरोधी यंत्रणा म्हणून काम करतात, मासेमारी समुदायाला आधार देतात आणि पर्यावरणीय समतोल राखतात.

# पिल्लई मेकरथॉन उत्साहात



**पनवेल : वार्ताहर**

पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग (पीसीई) आणि पिल्लई कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (पीआयसीए) यांनी आयोजित केलेल्या मेकरथॉन २०२४ मध्ये ४९६ विद्यार्थ्यांच्या १२४ संघांनी १२४ मार्गदर्शकांसह भाग घेतला.

मेक इन इंडियाच्या अनुषंगाने आंतरशालेय आणि आंतरमहाविद्यालयीन तंत्र अलौकिक बुद्धिमत्ता तसेच तल्लखपणासाठी हा एक दिवसीय उपक्रम आहे. धोरणात्मक दृष्टीकोन म्हणजे विज्ञान आणि तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे आणि आधुनिक आणि कार्यक्षम पायाभूत सुविधा.

पीसीई प्राचार्य डॉ. संदीप जोशी यांनी सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या यशस्वी प्रयत्नांबद्दल आणि अभ्यासाबद्दल संबोधित केले. कार्यक्रमाचे प्रमुख डॉ. अरुण एस पिल्लई यांनी कार्यक्रमाची ओळख करून दिली.

पिल्लई कॉलेजच्या सभागृहात मेकरथॉन-२०२४चा समापन समारंभ पिल्लई महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता, जिथे प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, हा कार्यक्रम नाविन्यपूर्ण वस्तु बनवण्यासाठी व प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी होता आणि पुढे जावुन प्रयोगशाळेत आत्मविश्वासाने काम करण्यासाठी आहे. पीआयसीएच्या प्राचार्या डॉ. सुझा माहिमकर म्हणाल्या की, या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना आव्हानांना धैर्याने सामोरे जाण्यास आणि समाधान मिळण्यास प्रवृत्त केले, त्यामुळे तुमच्या हृदयाचे अनुसरण करा आणि यश, इच्छित, अपेक्षित परिणाम साध्य होईल.

इंजिनीअरिंग श्रेणीतील विज्ञान आणि तंत्रज्ञान श्रेणीतील शालेय गटातील विजेते एमएनआर स्कूल ऑफ एक्सलन्स, कामोठे - प्रथम पारितोषिक, राधी इंकसॅप स्कूल, कामोठे - द्वितीय पारितोषिक आणि आझाद इंग्लिश स्कूल, ठाणे - तृतीय पारितोषिक विज्ञान आणि विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या कनिष्ठ महाविद्यालय गटातील विजेते न्यू होरायझन पब्लिक स्कूल, नवीन पनवेल - प्रथम पारितोषिक, केरळी समाजम मॉडेल कॉलेज, डोंबिवली - द्वितीय पारितोषिक आणि के.ई.एस.व्ही.के. कनिष्ठ महाविद्यालय, पनवेल - तृतीय पारितोषिक आहेत.

आर्किटेक्चर श्रेणीतील शालेय गटातील क्रिएटिव्हिटी स्पीक्सचे विजेते रायन इंटरनॅशनल स्कूल, सानपाडा - प्रथम पारितोषिक, सरस्वती माध्यमिक विद्यालय, ठाणे (प.) - द्वितीय पारितोषिक आणि अपीजे स्कूल, नेरुळ - तृतीय पारितोषिक आहेत आणि क्रिएटिव्हिटी स्पीक्स कनिष्ठ महाविद्यालय गटातील क्रिएटिव्हिटी स्पीक्सचे विजेते चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल - प्रथम पारितोषिक, टी एच वाजेकर हायस्कूल, उरण - द्वितीय पारितोषिक, आणि सेंट जोसेफ हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स, कळंबोली - तृतीय पारितोषिक आहेत. विजेत्यांची ट्रॉफी आणि २ लाखांची रोख पारितोषिके डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई अध्यक्ष एमईएस, डॉ. प्रियम पिल्लई सीओओ एमईएस, श्री फ्रणव पिल्लई, मुख्य विपणन आणि ब्रँडिंग अधिकारी एमईएस, डॉ. सुझा माहीमकर, पीआयसीएच्या प्राचार्या, डॉ. संदीप जोशी, प्राचार्य, पीसीई, डॉ अरुण एस पिल्लई, डॉ अविनाश वैद्य, इ. यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. मेकरथॉन - २०२४ ची रचना डॉ अरुण पिल्लई यांनी केली होती. जे पिल्लई कॅम्पसच्या विविध शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय कनेक्ट कार्यक्रमांसाठी ओळखले जातात. अनुभवात्मक शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकासाला चालना देणे आणि वास्तविक जगातील आव्हानांसाठी तयार करणे. अनुभवात्मक शिक्षण तांत्रिक प्रगती, बदलते शैक्षणिक प्रतिमान आणि सामाजिक गरजानुसार सतत विकसित होत राहते.

# दत्त जयंतीनिमित्त सप्ताह

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथे पुरातन देवस्थान असलेल्या दत्त मंदिरात दत्त जयंतीचे आयोजन करण्यात आले आहे. १० डिसेंबर ते १४ डिसेंबर असे पाच दिवस विविध सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सानपाडा देवस्थान ट्रस्टतर्फे दरवर्षी दत्त जयंती साजरी करण्यात येत असते. मुख्य म्हणजे ही दत्तगुरुंच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी म्हणून सानपाडा मंदिराची ओळख आहे. या ठिकाणी दत्त महाराजांची पावले असून, त्याची नित्यानियममाने साग्रसंगीत पूजा करण्यात येते. १४ डिसेंबर रोजी दत्त जयंती असली तरी, १० तारखेपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात दररोज पहाटे काकड आरती, भजन, श्री गुरुचरित्र पारायण, आरती, हरिपाठ तसेच सायंकाळी कीर्तन असणार आहे. विविध भजन मंडळी यात सहभागी होणार आहेत. तर दत्त जयंती दिनी दत्त गुरूंच्या पदुकांवर अभिषेक, गुरुचरित्र पारायण,विविध भजनी मंडळे भजन सादर करणार आहेत.

याशिवाय भक्ती संगीत कार्यक्रम, दत्त जन्माचे पळणागीत व रात्री पालखी मिरवणूक काढली जाणार आहे तसेच महाप्रसादही असणार आहे.

### नवी मुंबईतील सर्वात मोठा उत्सव

ठाणे-बेलापूर पट्टीतील सर्वात मोठा दत्त जयंती उत्सव म्हणून सानपाडा गावातील या महोत्सवाची ओळख आहे. १९५२ साली सानपाडा देवस्थान ट्रस्टची स्थापना झाली. स्वयंभू श्री दत्त मंदिर असल्याने याठिकाणी अनेक वर्षांपासून चार ते पाच दिवसांचा सप्ताह साजरा केला जातो. त्यानिमित्ताने जत्राही भरते. नवी मुंबई, पनवेल उरण ठाण्यातून तब्बल २० हजारांपेक्षा जास्त भाविक दरवर्षी दत्त जयंती निमित्त श्री दत्तागुरुंच्या चरणाचे दर्शन घेण्यासाठी येतात. दर गुरुवारी मंदिरात भांडाऱ्याचे आयोजन केले जाते. भांडाऱ्यात अन्नदान करण्यासाठी दोन दोन वर्ष भाविकांना वाट पाहावी लागते.

# यंदा मलावी हापूसच्या उत्पादनात घट

## एपीएमसी बाजारात आवक निम्म्यावर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत नोव्हेंबर अखेरीस परदेशी मलावी हापूस दाखल होतो. दिवसेंदिवस याची मागणी वाढत आहे, मात्र यंदा बाजारात एक दिवस आड करून मलावी हापूस दाखल होत आहे. यंदा मलावी हापूसचे उत्पादन अवघे ५० टक्के असणार आहे, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

हापूस म्हटला की रत्नागिरी, देवगड हापूसची गोडी डोळ्यासमोर येते. देवगडचा हापूस अवीट गोडीसाठी प्रसिद्ध आहे. कोकणातील हापूस आंब्याप्रमाणेच या मलावी हापूस आंब्याची चव, रंग, सुगंध असल्याने खवय्यांना सुवर्णसंधी आहे. मलावी मधील ६०० हेक्टर जमिनीवर या हापूस आंब्याची लागवड करण्यात आली आहे. १३ वर्षांपूर्वी रत्नागिरीमधून ४० हजार हापूस आंब्याच्या काड्या मलावी मध्ये नेल्या होत्या. मलावी मधील हवामान कोकणातील हवामानासारखेच उष्ण दमट असल्याने तिथे लागवड केलेल्या आंब्याला फळधारणा चांगली होते. त्यामुळे ग्राहक देशी हापूस इतकेच परदेशी हापूसला पसंती देत आहेत.




एपीएमसी बाजारात फेब्रुवारीमध्ये देशी हापूसचा हंगाम सुरू होतो. मात्र तत्पूर्वी बाजारात नोव्हेंबर- डिसेंबर मध्ये आफ्रिकन मलावी हापूस दाखल होतो. यंदा बाजारात डिसेंबरअखेर पर्यंत मलावी हापूस हंगाम असणार आहे. मागील वर्षी आतापर्यंत ३ हजार बॉक्स दाखल झाले होते तर आतापर्यंत केवळ १२०० बॉक्स दाखल झाले आहेत. सध्या बाजारात १२०० बॉक्स दाखल झाले असून तीन किलो पेटीला २२०० -५००० हजार रुपये बाजारभाव आहे.

यंदा मलावी हापूसचे उत्पादन ५० टक्के आहे. त्यामुळे आवक कमी होईल तसेच आकाराने लहान असलेले हापूस अधिक दाखल होत आहेत, अशी माहिती फळ बाजार संचालक संजय पानसरे यांनी दिली आहे.

# वाशी येथे राज्यस्तरीय मातृवंदन पुरस्कार सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

यमुनाई फाउंडेशन, नवी मुंबई यांच्या वतीने राज्यस्तरीय मातृवंदन पुरस्कार सोहळा ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अशोक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली वाशी येथे मोठ्या उत्साहात झाला.

दरवर्षी महाराष्ट्रात समाजकार्य करणाऱ्या व्यक्तीना यमुनाई फाउंडेशन, नवी मुंबई संस्थेच्या पुढाकाराने राज्यस्तरीय मातृवंदन पुरस्कार देऊन त्याच्या उज्वल कार्याचा गौरव करण्यात येतो, यंदाही यमुनाई मातृवंदन पुरस्कार सोहळा रविवारी (दि.८) वाशीतील गुरव ज्ञाती हॉलमध्ये झाला.

या सोहळ्याला अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अशोक पाटील होते. प्रारंभी, सोहळ्याचे उद्घाटन चित्रपट निर्माते मुकुंद महाले यांनी केले. या वेळी




व्यासपीठावर संस्थाध्यक्ष मोहन भोईर, कार्याध्यक्ष ॲड. चंद्रकांत मढवी, कार्यवाह पुंडलिक म्हात्रे, साहेबराव गायकवाड, भगवान ठाकूर, साहित्यिक इकबाल कवारे, श्रीकांत पाटील, साहित्यिका व कवित्री दमयंती भोईर आदी उपस्थित होते.

आई नावाचा हळवा कोपरा प्रत्येकाच्या मनात दडलेला असतो. आईच्या ऋणातून उतराई व्हावे म्हणून मोहन भोईर दरवर्षी मातृवंदन सोहळा घेत असून हा सोहळा आजच्या युवा पिढीसाठी एक आदर्शवत आणि प्रेरणादायी असल्याचे मत अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अशोक पाटील यांनी व्यक्त केले.

या वेळी यमुनाई सहजिवन पुरस्कार स्नेहाराणी साहेबराव गायकवाड तर राज्यस्तरीय यमुनाई मातृवंदन पुरस्कार पत्रकार दत्तात्रय सूर्यवंशी, संध्या दिवेकर, राखी पाटील, अरुण पाटील, भास्कर पाटील, राजेंद्र नाईक, बापू आजगावकर, जयराम पाटील, फुलचंद भगत यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारविरोधात स्वाक्षरी मोहीम; खालापूर तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**खालापूर : रामप्रहर व्रुत्त**

हिंदू अल्पसंख्याकावर बांगला देशात कट्टर पंथीयाकडून आत्याचाराच्या घटनेचे व्हिडीओ प्रसार माध्यमांवर प्रसारित होत असल्यामुळे या घटनेचा निषेध करण्याकरीता खालापूर तालुक्यातील सकल हिंदू समाजाच्यावतीने स्वाक्षरी मोहीम आयोजित करण्यात आली होती या स्वाक्षरी मोहीमेस उत्स्फूर्त प्रतीसाद मिळाला.



बांगलादेशात अल्पसंख्याकांची मंदिरे,घरे,दुकाने जाळली जात आहेत. महिलांवर अत्याचार होत आहेत.या घटना त्वरित थांबविण्यासाठी मानवाधिकार व केंद्र सरकारने तत्काळ दखल घेऊन येतील हिंदुना व अल्पसंख्याकाना न्याय मिळवून द्यावा या मागणीसाठी खालापूर तालुक्यातील सकल हिंदू समाजाच्या वतीने खालापूर पोलीस स्टेशन बाहेर स्वाक्षरी मोहीम आयोजित करण्यात आली होती.

सकल हिंदू समाजाने स्वाक्षरी मोहीमेस उत्स्फूर्त प्रतीसाद देऊन बांगलादेशामधील घटनेचा तीव्र निषेध केला.

नायब तहसिलदार सुधाकर राठोड यांना निवेदन देण्यात आले.यावेळी रुपेश मेस्त्री ,संदीप गोसावी,सचिन कुडपाणे, रुपेश लबडे,अतुल कोठारी, गौरव तटकरे,संतोष गंडेरवार,भाजपा खालापूर पूर्व प्रभारी तालुका अध्यक्ष सनी यादव,जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे,महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष आश्विनीताई पाटील,भाजपा खालापूर तालुका सरचिटणीस रवींद्र पाटील,भाजपा युवा मोर्चा तालुका नागेश पाटील,भाजपा खालापूर शहर अध्यक्ष दिपक जगताप,भाजपा खोपोली शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर,आबा देशमुख ,विशाल रसाळ,जगदीश आगिवले , हेमंत नांदे, सुनील नांदे,राहुल जाधव,रवींद्र मोरे,जयेंद्र पाटील,राखी गणेशकर, स्नेहल सावंत,रसिका शेटे,आश्र्विनी आत्रे , योगेश जाधव,बाळू जाधव, अमीर पारठे,शिवलिंग वाघरे आदी सकल हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पाली शहरात बेकायदेशीर पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

**सुधागड : रामप्रहर वत्त**

पाली शहरात बेकायदेशीर वाहन पार्किंगमुळे पादचारी व शाळकरी विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा तक्रार देऊन देखील उपाययोजना मात्र शून्य आहे. नगरपंचायत व पोलीस प्रशासन या अवैध पार्किंगवर कारवाई कधी करणार याकडे पालीकरांचे लक्ष लागले आहे.

पाली शहरातील मुख्य रस्त्यांवर आणि शाळांच्या परिसरात बेकायदेशीर वाहन पार्किंगमुळे पादचारी आणि शाळकरी विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांवर वाहनांची गर्दी



वाढल्याने अपघातांची शक्यता वाढली आहे. नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केल्या असल्या तरी प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही.

बेकायदेशीर पार्किंगमुळे रस्त्यांवर चालणे कठीण झाले आहे. शाळकरी विद्यार्थी आणि पादचारी यांना रस्त्यांवरून चालताना जीव मुठीत धरून चालावे लागते. यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. नागरिकांनी प्रशासनाला या समस्येवर त्वरित उपाययोजना करावी, अशी वारंवार विनंती केली आहे.

# शाहू महाराज नाट्यगृहाला येणार नवीन झळाळी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहराचा सांस्कृतिक वारसा असलेले छत्रपती शाहू महाराज सामाजिक सभागृह व नाट्यगृहाची कोरोना काळ व त्यानंतरच्या मागील तीन वर्षे दयनीय अवस्था झाली आहे. त्या विरोधात शहरातील नाट्यप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते व सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी नगरपालिका प्रशासन विरोधात सतत नाराजी व्यक्त केली होती याची दखल घेत आमदार महेंद्र थोरवे यांनी नाट्यगृह डागडुजी व नूतनीकरण कामासाठी अंदाजे पाच कोटी निधी मंजूर करून नगरपालिका कडे सुपूर्द केला आहे.



> **या नाट्यगृहाची उत्तमरीत्या देखभाल करण्याचे प्रशासनाने स्वतःची यंत्रणा कार्यान्वित करावी ठेकेदाराच्या हाती नाट्यगृह देऊ नये.**
> **–निशा प्रमोद पाटील, नाट्यप्रेमी**

या निधीच्या माध्यमातून आत्ता कामाला सुरुवात झाली आहे. आगामी चार पाच महिन्यात ही कामे पूर्णत्वास येणार असल्याचे नगरपालिका प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. यात सुशोभिकरण, छताची, आसन व्यवस्था, इंटेरिअर व विद्युतरोषणाई, एसी, साउंड सिस्टीम व अन्य डागडुजीची कामे पूर्णत्वास येणार आहेत. ही सर्व कामे पूर्णत्वास येण्यास साधारण चारपाच महिने कालावधी लागणार असल्याचे सांगितले जात आहे

नाट्यगृह व सामाजिक सभागृह पुन्हा सुस्थितीत सुरू होणार असल्याने, शहरातील नाट्यकर्मी , नाट्यप्रयोग आयोजन करणारी मंडळी व सर्वसामान्य नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

# सुधागडमध्ये विजेच्या लपंडावाने नागरिक त्रस्त

**सुधागड : रामप्रहर वत्त**

सुधागडमध्ये विजेच्या लपंडावामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. वीज पुरवठा खंडीत झाल्याने सरकारी कार्यालयांची कामे देखील रखडली जात असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित होणे, हे नागरिकांसाठी मोठी समस्या बनली आहे. .

विजेच्या लपंडावामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासात खंड पडत आहे आणि व्यापाऱ्यांचे व्यवसाय देखील प्रभावित होत आहेत. काही ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे पाणीपुरवठा देखील बाधित झाला आहे, ज्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत आहे.

महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या समस्येवर त्वरित उपाययोजना करावी. लवकरच या समस्येवर तोडगा निघाला नाही, तर आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# खराब हवामानामुळे मच्छीमार आर्थिक संकटात

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनमध्ये मच्छिमारांची जीवनरेखा असलेल्या समुद्रात दक्षिणेकडील खराब हवामानामुळे गेल्या काही महिन्यांपासून वातावरण अत्यंत खराब आहे त्यामुळे समुद्रात मासे मिळत नसल्याने त्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो आहे.त्यामुळे मच्छिमार त्रस्त झालेले आहेत.



श्रीवर्धन, मुळगाव, दांडा, बागमांडला, भरटखोल, दिवेआगर, कुडगाव, आदगाव, आणि दिघी येथील मच्छिमार बांधवांनी त्यांच्या बोटींना किनाऱ्यावर नांगरून ठेवले आहे, मच्छिमारांचे मासेमारी हे मुख्य व्यवसाय असल्याने मच्छी मिळत नसल्याने आर्थिक कोंडी झाली आहे.

या वर अधारीत असलेले अनेक छोट्या–मोठ्या दुकानदार, टेम्पो, पिकअप आणि रिक्षा चालकांची दैनंदिन आयुष्यं थांबली आहेत. बर्फ, डिझेल, रेशनिंग व इतर सामान खरेदी करण्यासाठी मच्छिमार हजारो रुपये खर्च करतात, पण समुद्रात मासे मिळत नसल्याने परिणामी, या मच्छिमारांच्या कर्जाचा ओझा वाढत आहे. आणि त्यांचा व्यवसाय संकटात सापडला आहे.

सरकारने या गोष्टीचा गांभिर्याने दखल घेऊन मच्छीमाराचा आर्थिक संकटातून मार्ग काढावा असे मच्छिमारांचं म्हणणं आहे. समुद्रात जोरदार वारे वाहत आहेत, आणि यामुळे त्यांना बोट समुद्रात न पाठवण्याचं निर्णय सध्या तरी मच्छीमार बांधवाने घेतल्याचा दिसत आहे.कारण खोल समुद्रात जाऊन सुद्धा मासे मिळत नाहीत.

यामुळे श्रीवर्धन तालुक्यात मंदीचे सावट आले आहे.याचा परिणाम बाजारपेठेवर मंदीचा फटका बसला आहे आणि श्रीवर्धन मच्छीमार्केट नेहमीच गजबजलेलं असतो , तेथे सध्या आता शांती आहे. सध्याच्या परिस्थितीत कामगारांचं जीवन देखील कठीण बनलं आहे. त्यांना रोजची जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

. सरकारने मच्छिमारांच्या एक विशेष पॅकेज देऊन त्यांच्या आर्थिक संकटावर तोडगा काढावा अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील मच्छीमार बांधवाकडुन करण्यात येत आहे.मच्छिमारांना आता सरकारच्या सहकार्याची आवश्यकता आहे. अशी स्थिति असताना सरकारने मदतीचा हात पुढे करून, मच्छिमारांची आर्थिक स्थिती सुधारावी आणि त्यांना नवीन संधी मिळवून देणं अत्यंत गरजेचं आहे.

# मध्य रेल्वेच्या ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत हरवलेल्या मुलांची सुटका

## ■ ऑपरेशन अमानत अंतर्गत प्रवाशांचे हरवलेले सामान दिले परत मिळवून

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या आरपीएफने शासकीय रेल्वे पोलीस (जीआरपी) आणि इतर फ्रंटलाइन रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने जानेवारी ते नोव्हेंबर–२०२४ या कालावधीत, १०९९ मुलांची (७४० मुले आणि ३५९ मुली) सुटका केली आणि त्यांना त्यांच्या कुटुंबियांशी जोडले. यामध्ये चाइल्डलाइन सारख्या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने त्यांच्या पालकांशी पुनर्मिलन झालेल्या मुला–मुलींचा समावेश आहे.

रेल्वे संरक्षण दलाला रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत मुलांना वाचवण्याची जबाबदारीही ते पार पाडत आहे.

रेल्वे स्थानकावर कोणत्यातरी वादामुळे, कौटुंबिक समस्या, चांगल्या आयुष्याच्या किंवा शहराच्या ग्लॅमरच्या शोधात आलेल्या मुलांचा शोध प्रशिक्षित आरपीएफ जवानांकडून घेतला जातो. हे प्रशिक्षित आरपीएफ कर्मचारी मुलांशी संपर्क साधतात. त्यांच्या समस्या समजून घेतात आणि त्यांना त्यांच्या पालकांशी पुन्हा जोडण्यासाठी समुपदेशन देतात. या उदात्त सेवेबद्दल अनेक पालक मनापासून कृतज्ञता आणि आभार व्यक्त करतात.

जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मध्य रेल्वेवरील सुटका/पुनर्मिलन करण्यात आलेल्या मुलांचे विभागनिहाय तपशील मध्ये पहाता वाचवण्यात/पुनर्मिलन करण्यात





आलेली मुले मुंबई विभाग – ३७९ मुले (२४२ मुलगे आणि १३७ मुली), भुसावळ मंडळ – २४७ मुले (१४१ मुलगे व १०६ मुली), पुणे विभाग – २४६ मुले (२११ मुलगे आणि ३५ मुली), नागपूर विभाग – १६८ मुले (१०७ मुलगे व ६१ मुली), सोलापूर मंडळ – ५९ मुले (३९ मुलगे व २० मुली),नोव्हेंबर–२०२४ मध्ये सुटका करण्यात आलेल्या मुलांची संख्या १२४ होती, ज्यामध्ये ७८ मुलगे आणि ४६ मुलींचा समावेश होता.त्या तुलनेत जानेवारी ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत सुटका/पुनर्मिलन करण्यात आलेल्या मुलांची संख्या १०५३ (७४१ मुलगे आणि ३१२ मुली) होती.

रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्याच्या मूलभूत कर्तव्याव्यतिरिक्त, ऑपरेशन अमानत अंतर्गत आरपीएफ ने गरजू प्रवाशांना मदत करणे आणि मोबाईल फोन, लॅपटॉप, दागिने, रोख इ. यासारख्या मौल्यवान वस्तू परत करणे आणि प्रवाशांच्या मागे राहिलेल्या वस्तू परत करणे हे कर्तव्याच्या पलीकडे जाऊन केलेले कार्य आहे. चालू वर्षात, जानेवारी ते नोव्हेंबर–२०२४ दरम्यान, 'ऑपरेशन अमानत' अंतर्गत, आरपीएफ ने ५.२२ कोटी रुपये मूल्याच्या प्रवाशांच्या १४९१ वस्तू पुनर्प्राप्त केल्या आहेत. त्यापैकी ४३.७२ लाख रुपये किमतीच्या १५७ वस्तू केवळ नोव्हेंबर–२०२४ मध्ये पुनर्प्राप्त करण्यात आल्या. त्या तुलनेत जानेवारी ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत ४.१२ कोटी रुपयांच्या १४९४ वस्तू पुनर्प्राप्त करण्यात आल्या. यामध्ये बॅग, मोबाईल फोन, पर्स, लॅपटॉप व इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश आहे.

प्रवाशांच्या पुनर्प्राप्त केलेल्या सामानाचे विभागनिहाय तपशील पहाता मुंबई विभागातील पुनर्प्राप्त ६४९ वस्तूंची किंमत २.५५ कोटी रुपये आहे, भुसावळ मंडळातील पुनर्प्राप्त २६१ वस्तूंची किंमत १.०७ कोटी रुपये आहे.नागपूर विभागातील पुनर्प्राप्त ३२२ वस्तूंची किंमत ६७.८९ लाख रुपये आहे.सोलापूर विभागातील पुनर्प्राप्त ८८ वस्तूंची किंमत ५१.८६ लाख रुपये आहे.पुणे विभागातील पुनर्प्राप्त १७१ वस्तूंची किंमत ३९.७३ लाख रुपये आहे

या रेल्वे संरक्षण दलाच्या कर्मचाऱ्यांना प्रवासी आणि रेल्वे मालमत्तेवरील गुन्हे, अतिरेकी हिंसाचार, रेल्वे वाहतूक विस्कळीत होणे इत्यादी विविध सुरक्षा आव्हानांचाही सामना करावा लागतो. रेल्वे संरक्षण दलाच्या या शूर सैनिकांच्या कार्याचा सारांश सुरक्षा, दक्षता आणि सेवा असा देता येईल आणि त्यांनी नेहमीच अत्यंत निष्ठेने, सतर्कतेने आणि धैर्याने आपले कर्तव्य पार पाडले जात आहे.

# पेणमध्ये वनराई बंधारे बांधण्याची लगबग

**पेण : प्रतिनिधी**

पाणी अडवा पाणी जिरवा ही मोहीम गेली दोन दशकांहून अधिक कालखंडापासून सुरु आहे. मान्सूनचा कालावधी संपताच नैसर्गिक वाहणारे छोटे ओव्होळ, नाले, झरे व नदीपात्रातील पाणी अडविणे व त्याचा विनीयोग परीसरातील भाजीपाला शेतीला करण्यासाठी जिल्हा परिषदेचा आणि तालुका कृषी विभागाचा वनराई बंधारे बांधण्याचा संकल्प असतो. पंचायत समिती स्तरावर. प्रत्येक ग्रामपंचायतीस वनराई बंधारे बांधण्याचे उदिष्ट दिले जाते. पेणच्या ३० ग्रामपंचायतीकडून वनराई बंधारे बांधण्याची लगबग सुरु झाली आहे.



पेण ग्रामीण विभागातील खरोशी, दूरशेत, जिते, वरसई, महलमिरा डोंगर, तरणखोप, रोडे, पाबळ, जिर्णे, करोटी, डोलवी, वडखळ, निगडे, खारपाले, वरप, शेडाशी, बोरगाव, वरवणे, वाशिवली, निधवली, सापोली, जावळी, बेलवडे, आंबेघर, करंबेली–अराव, कांदळे, मळेघर, सापोली, वाक्रुळ, कामार्ली या ३० ग्रामपंचायती कार्यक्षेत्रातील डोंगरातून वाहणारे झरे, छोटे ओहोळ नद्यांची पात्र यामधे उन्हाळी एप्रिल महिन्यापर्यंत पाणी अडवून वनराई बंधारे बांधले जाणार असून यामधे तब्बल शंभराच्या वर हे मोठे बंधारे तर लहान बंधा–यांची संख्या दिडशे ते दोनशेच्या आसपास आहे. या साठवण पाण्याचा उपयोग भाजीपाला शेती आणि जनावरांसाठी पिण्याचे पाणी यासाठी वनराई बंधारे कायम उपयोगी पडतात. सध्या थंडीचा हंगाम व रब्बीत पेरणी भाजीपाला लागवड सुरु असल्याने वनराई बंधारेही लोकसहभागातून बांधण्यासाठी ग्रामपंचायती प्रयत्नशील असतात.

या साठी लागणारे मटेरिअल प्लास्टीक पिशव्या आणि इतर साहित्य ग्रामपंचायत पुरविते नागरिक या श्रमदानात मोठ्या संख्येने सहभागी होतात. स्मार्ट व्हीलेज असलेल्या पेणमधील या जवळपास ३० ग्रामपंचायती क्षेत्रातील भाजीपाला आणि कडधान्य पिकासाठी वनराई बंधारे वरदान ठरले आहेत.

वरसई, पाबळ – जिर्णे खोरे, सावरसई महलमिरा डोंगर, खरोशी आणि दूरशेत या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील भाजीपाला आणि कडधान्य मोठ्या प्रमाणात रब्बी हंगामात घेतली जातात. भाजीपाला तर मोठ्या प्रमाणात पनवेल आणि नवी मुंबई येथिल मार्केट् मध्ये नेला जातो याशिवाय सिंचनाच्या पाण्यावर भातशेती ही केली जाते ज्या ठिकाणी सिंचन व्यवस्था नाही तिथे मात्र वनराई बंधारे बांधून भाजिपाला शेती करण्यात येते.

पाणी हे समृद्धीचा महत्वाचा स्त्रोत आहे.या परिसरातील मुख्य नाले ओढे यांचे वाहणाऱ्या पाण्याला प्रतिबंध करण्यासाठी प्लॅस्टिक पिशवीत माती भरुन नदी नाले ओढे यांना बंधारे बांधून पाणी अडवून भाजीपाला आणि कडधान्य शेती फुले यांची लागवड करुन शेतकरी बांधवांना उत्पन्न मिळावे ही पूर्वापार चालत आलेली पध्दत आजही कायम आहे.समृध्द शेती आणि शेतकरी हा तीन महिन्यांत या पाण्याचा विनियोग केला जातो यासाठी श्रमदानाने खरोशी येथे बंधारा बांधला जातो असे यावेळी दुरशेत माजी सरपंच जनार्दन गावंड यांनी दिली.

# डॉ. आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील माजी विद्यार्थ्यांच्या संमेलनाला प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील पदविका विभागातील संगणक विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या संमेलनाला उत्साहपूर्ण प्रतिसाद लाभला. या संमेलनामध्ये संगणक क्षेत्रांत यशस्वी झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताचे औपचारिक कार्यक्रम पार पडले. उपस्थित मान्यवरांनी माजी विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक केले. संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून पदविका विभागाचे प्राचार्य डॉ. मधुकर दाभाडे हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि सामाजिक योगदानाचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमामध्ये माजी विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांचे आणि यशोगाथांचे मनमोकळ्या गप्पांद्वारे शेअरिंग केले. त्यांनी संस्थेने त्यांच्या यशात दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश संमेलनाचे आकर्षण ठरले. विविध कला सादरीकरणांमुळे वातावरण रंगले.या कार्यक्रमासाठी संगणक विभागाचे विभाग प्रमुख प्रा. साबळे, डॉ. गीतांजली महामुणकर, प्रा. सिद्धेश जाधव प्रा. सतीश नन्नावरे, प्रा. श्रुती चिनके आदी उपस्थित होते.

# टायटन्सचा वॉरियर्सवर थरारक विजय

## प्रो कबड्डीत शेवटच्या मिनिटापर्यंत रंगला थरार

**पुणे : प्रतिनिधी**

अकराव्या प्रो कबड्डी लीग स्पर्धेत शेवटच्या मिनिटापर्यंत रंगतदार झालेल्या लढतीत तेलुगु टायटन्स संघाने बंगाल वॉरियर्सविरुद्ध ३४-३२ असा रोमहर्षक विजय नोंदविला. मध्यंतराला त्यांच्याकडे १६-१५ अशी एक गुणाची नाममात्र आघाडी होती.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत याआधीच्या सामन्यात तेलुगु संघाला पूर्वार्धात सात गुणांची आघाडी घेऊनही युपी योद्धा संघाकडून पराभूत व्हावे लागले होते. त्यामुळेच त्यांच्या कामगिरीविषयी उत्सुकता निर्माण झाली होती. आतापर्यंत झालेल्या १६ सामन्यांपैकी नऊ सामने त्यांनी जिंकले आहेत. बंगाल वॉरियर्स संघाला आतापर्यंत झालेल्या १५ सामन्यांपैकी केवळ चारच सामने जिंकता आले आहेत. त्यापैकी येथील सामन्यात त्यांनी हरियाणा स्टीलर्स संघावर मात




केली होती. या विजयामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला होता.

या दोन्ही संघांमधील लढतीत सुरुवातीपासूनच विलक्षण चुरस पहावयास मिळाली. दोन्ही संघ आघाडी मिळवण्यासाठी प्रयत्न करीत होते, तथापि दोन्ही संघांना फार वेळ आघाडी मिळत नव्हती. दोन्ही संघांच्या खेळाडूंनी आक्रमक चढायांबरोबरच उत्कृष्ट पकडीही केल्या सामन्याच्या दहाव्या मिनिटाला तेलुगु संघाकडे आठ विरुद्ध सात अशी केवळ एक गुणाचे आघाडी होते. त्यानंतर दोन मिनिटांनी त्यांनी १४-१० अशी आघाडी घेतली होती, मात्र हा आनंद त्यांना फार वेळ टिकला नाही. मध्यंतराला तेलुगु संघाकडे १६-१५ अशी केवळ एक गुणाची आघाडी होती.

उत्तरार्धात सुरुवातीपासूनच दोन्ही संघाकडून आघाडीसाठी जोरदार प्रयत्न होत होते. कधी तेलुगु संघाकडे, तर कधी बंगाल संघाकडे आघाडी होती. या दोन्ही संघांच्या खेळाडूंनी केलेल्या जिद्द व चिकाटी खेळामुळेच सामना विलक्षण रंगतदार झाला. उत्तरार्धातील बाराव्या मिनिटाला बंगाल संघावर लोण नोंदविला गेला. तेथूनच तेलगू संघाला महत्त्वपूर्ण आघाडी मिळाली.

शेवटची दोन मिनिटे बाकी असताना तेलगू संघाकडे ३१-२८ अशी आघाडी होती. त्यांनी आपली आघाडी कायम ठेवत सामना जिंकला. त्यांच्याकडून आशिष नरवाल व कर्णधार विजय मलिक यांनी अनुक्रमे ९ व ११ गुण नोंदविले. बंगाल संघाकडून मनिंदर सिंग याने १४ गुण मिळविले, तर मनजितने सात गुणांची कमाई केली.

# राज्यस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत 'सीकेटी'चे विद्यार्थी चमकले







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील आदित्य मुंढे या विद्यार्थ्याने रौप्य, तर दीक्षा वलवे या विद्यार्थिनीने कांस्यपदक पटकावले आहे.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित राज्यस्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धा बारामती जिल्हा क्रीडा संकुल येथे झाली. या स्पर्धेत सीकेटी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रामशेठ ठाकूर कॉलेजचे कुस्ती स्पर्धेत यश




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठांतर्गत शेठ हिराचंद मुठा महाविद्यालय आयोजित कुस्ती स्पर्धेत यश संपादन केले आहे.

महाविद्यालयातील व्यवसाय व व्यवस्थापन विभागातील प्रथम वर्षाचा सिद्धेश खडकर याने रौप्य, तर अकाउंट व फायनान्स विभागातील तृतीय वर्षाचा विशाल पुजारी व प्रथम वर्षाचा शिवशंदर साहू यांनी कांस्यपदक पटकाविले. त्यांना महाविद्यालयातील जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर व फिजिकल डायरेक्टर अजिंक्य भगत यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे कार्यकारी संचालक आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत चेंबूर क्रीडा केंद्र, एसआयईएस अंतिम फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

चेंबूर क्रीडा केंद्र, एसआयईएस यांनी मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनने कांदिवली येथे आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत पूर्व विभाग किशोरी गटाच्या अंतिम फेरीत धडक दिली, तर अभिनव मंडळ, बालवीर स्पोर्टस् यांनी पूर्व विभाग किशोर गटाच्या उपांत्यपूर्व फेरी प्रवेश केला.

चेंबूर क्रीडा केंद्राने किशोरी गटाच्या उपांत्य सामन्यात नवशक्ती स्पोर्टस्‌चा ३२-१३ असा सहज पराभव करीत अंतिम फेरी गाठली. आक्रमक सुरुवात करीत चेंबूरने पूर्वार्धात दोन लोण देत २१-०६ अशी आघाडी घेत विजयाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले. उत्तरार्धात आणखी एक लोण देत सामना एकतर्फी केला. तृप्ती माहरवा, रिया चांदोरकर यांच्या चढाई पकडिच्या तुफानी खेळाला या विजयाचे श्रेय जाते. नवशक्तीची जान्हवी शेलार बरी खेळली.

दुसऱ्या किशोरी गटाच्या उपांत्य सामन्यात एसआयईएस संघाने हिड इंडियाचा ४१-०४ असा धुव्वा उडविला.





एसआयईएसने पहिल्या डावात २१-०१ अशी भक्कम आघाडी घेत आर्धी लढाई जिंकली होती. दुसऱ्या डावात तोच जोश कायम राखत ३७ गुणांच्या मोठ्या फरकाने अंतिम फेरीत धडक दिली. आस्था सिंग, जयश्री पार्टे, तनुश्री शिंदे यांच्या झंझावाती खेळामुळे हा विजय शक्य झाला.

किशोर गट पूर्व विभागाच्या उपउपांत्यपूर्व फेरीत अभिनव मंडळाने चेंबूर क्रीडावर ३४-२४ अशी मात करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली. विश्रांतीला लोण देत २९-०७ अशी आघाडी अभिनवने घेतली. विश्रांतीनंतर चेंबूर क्रीडाने लोण देत सामन्यात रंगत आणली, पण अभिनवने आणखी एक लोण देत विजय निश्चित केला. नितेश यादव, कार्तिक पाल अभिनव कडून, तर श्रावण तावडे, श्रीकांत दावरू चेंबूर क्रीडाकडून उत्कृष्ट खेळले. दुसऱ्या किशोर गटाच्या सामन्यात उपांत्यपूर्व फेरी गाठताना बालवीर स्पोर्टस्‌ने महाशक्तीला ३३-११ असे नमविले. आर्यन वाघमारे, सिद्धार्थ सावंत, रीतीक मेस्त्री यांच्या चतुरस्त्र खेळाने मध्यांतराला १६-०५ अशी आघाडी घेणाऱ्या बालवीरने नंतरदेखील त्याच जोमाने खेळ करीत विजय साकारला.

कुमारी गटाच्या पूर्व विभागात स्वराज्य स्पोर्टस्‌ने आराध्य स्पोर्टस्‌चा २४-०४ असा सहज पराभव करीत चौथी फेरी गाठली. पूर्वार्धात १७-०७ अशी स्वराज्यकडे आघाडी होती. सानिया इंगळे, सेरेना म्हसकर यांच्या धडाकेबाज खेळाला या विजयाचे श्रेय जाते.

प्रथम श्रेणी गटात स्वस्तिक मंडळाने सन्मित्र मंडळावर ३८-२१ असा विजय मिळवित तिसरी फेरी गाठली. प्रथमच द्वितीय श्रेणीतून प्रथम श्रेणीत बढती मिळालेल्या संमित्राने स्वस्तिकला या सामन्यात कडवी लढत दिली. आकाश रुडले, अलंकार पाटील स्वस्तिक कडून, तर सोहम पूंदे, प्रथमेश शेळके सन्मित्रकडून उत्कृष्ट खेळले.

# मिळालेल्या वेळेचा सरावासाठी सदुपयोग करा

## सुनील गावसकरांचा टीम इंडियाला सल्ला

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरील पहिली कसोटी अनपेक्षित कमबॅक करून जिंकल्यानंतर दुसऱ्या कसोटी भारतीय संघाला पराभवाचे तोंड पहावे लागले. भारताच्या लाजिरवाण्या पराभवानंतर लिटल मास्टर सुनील गावसकर यांनी भारतीय खेळाडूंची कानउघाडणी केली. सामना संपला म्हणून रूममध्ये पडून राहू नका, त्यापेक्षा या दोन दिवसांचा सदुपयोग करा, असा सल्ला गावसकरांनी दिला.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरी कसोटी तिसऱ्या दिवशी संपली. भारतीय फलंदाजांनी चाहत्यांना प्रचंड निराश केले. बड्या खेळाडूंना आपला ठसा उमटवता आला नाही. या साऱ्या प्रकारानंतर सुनील गावसकर यांनी भारतीय खेळाडूंना खडेबोल सुनावले. ते म्हणाले, जर कसोटी सामना पूर्ण वेळ सुरू राहिला असता तर तुम्हाला पाच दिवस मैदानात उतरून क्रिकेट खेळावे लागले असते. त्यामुळे आता पाच सामन्यांची सिरिज आहे हे विसरून जा. असा विचार करा की आता जे तीन सामने शिल्लक आहेत, त्या तीन सामन्यांचीच सिरिज आहे आणि त्या दृष्टीने तयारीला लागा. या सामन्यातील उरलेले दोन दिवस सत्कारणी लावा.
















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com